# श्री साईलीला

गुरुपौर्णिमा विशेषांक



बाबा बसाप्पाला वीरभद्रापासून वाचवितात.




जुलै )

मूल्य ६० पैसे

( १९७८

## श्रीसाई बाबांच्या जागतिक मंदिरातील

# मूर्तींच्या छायाचित्रांचे अपूर्व प्रदर्शन

### मंदिर चालकांना आग्रहाची विनंती

श्रीसाईबाबांच्या साठाव्या महानिर्वाण पुण्यतिथीच्या निमित्याने शिरडी येथे अगदी नजिकच्या काळात एक अपूर्व प्रदर्शन भरविण्यात येत आहे.

श्रीसाईबाबांची भारतात ठिकठिकाणी नव्हे तर जगातही मंदिरे आहेत. या मंदिरातून कुशल शिल्पकारांनी बाबांच्या विविध प्रकारे घडविलेल्या नयनरम्य अशा मूर्ती स्थापन केलेल्या आहेत. अनेक चित्रकारांनी आपल्या कुंचल्यातून बाबांच्या रेखीव सुंदर प्रतिमा चितारलेल्या आहेत. अशा या मूर्तींच्या व चित्रांच्या छायाचित्रांचे अपूर्व असे प्रदर्शन भरविण्याचे संस्थानने योजिले असून साईभक्तांना हे अभूतपूर्व प्रदर्शन पहाण्याची एक दुर्मिळ संधि लाभणार आहे.

श्रीसाईबाबांच्या जगातील ठिकठिकाणच्या मंदिर चालकांनी आपल्या मंदिरातील बाबांच्या मूर्तीची किंवा प्रतिमांची छायाचित्रे या प्रदर्शनासाठी पाठवून संस्थानला संपूर्ण प्रकारे सहकार्य करावयाचे आहे. या प्रदर्शनात भाग घेण्यासाठी कोणत्याही प्रकारची फी आकारण्यात आलेली नाही. मंदिर चालकांनी आपापल्या मंदिरातील मूर्तीचे किंवा प्रतिमेचे छायाचित्र २५ सेंटीमीटर लांब ( १० इंच ) व २० सेंटीमीटर रुंद ( ८ इंच ) या मोजमापात शक्य तर पिवळसर किंवा क्रीम रंगाच्या माऊंटवर चांगले चिकटवून पाठवायचे आहे. मंदिरात बाबांच्या एकाहून अधिक मूर्ती किंवा प्रतिमा असतील तर त्यांची सुद्धा याच मोजमापात छायाचित्रे माऊंटवर बसवून पाठवावीत. काचेच्या फ्रेमस् अजिबात पाठवू नयेत. सर्व चित्रांच्या मागे, चित्रातील मूर्ती कोणत्या मंदिरातील आहे, ती किती फूट उंचीची आहे, तिचा शिल्पकार कोण, चित्रकार कोण, केव्हा स्थापन केली याचा निर्देश असावा.

सर्व छायाचित्रे उशिरात उशिरा **१५ ऑक्टोबर १९७८** पर्यंत श्री. संपादक श्रीसाईलीला, 'साई निकेतन', ८०४ बी, दादासाहेब सर्कल, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई ४०००१४ या पत्त्यावर व्यवस्थित पाठवावीत.

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृति ॥



## श्रीसाई वाक्सुधा

ओम् नमोजी साई सदया ।
भक्तवत्सला करुणालया ।
दर्शनें वारिसी भक्त भवभया ।
नेसी विलया आपदा ॥ १ ॥

आरंभी वसती निर्गुणीं ।
तो तूं भक्तभावांचिया गुणीं ।
ओढूनि आणिलासी सगुणीं ।
संत चूडामणी साईनाथा ॥ २ ॥

निजभक्तोद्धारण कार्य ।
संतां सर्वदा अपरिहार्य ।
तूं तर संत वृंदाचा आचार्य ।
तुजसीही अनिवार्य तें आहे ॥ ३ ॥

जिहीं धरिलें तव चरणद्वय ।
पावले सकळ किल्मिष लय ।
जाहला पूर्वसंस्कारोदय ।
मार्ग निर्भय निष्कंटक ॥ ४ ॥

आठवूनियां आपुले चरण ।
येती महातीर्थींचे ब्राह्मण ।
करिती गायत्री पुरश्चरण ।
पोथी पुराण वाचिती ॥ ५ ॥

—श्रीसाईसच्चरित अध्याय ३० वा


# श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबांचे संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५७ वे ] जुलै १९७८ [ अं. ४

: संपादक :

श्री. क. ही. काकरे,

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

- डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
- श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )

वार्षिक वर्गणी रु. ६—०० (ट. ख. सह)
किरकोळ अंक ६० पैसे फक्त.

: कार्यालय :

"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४–बी,
डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.

पिन : ४०००१४

दूरध्वनी : ४४ ३३ ६१

# श्री साईसेवा श्रेय नामावली जुलै–१९७८


| | | |
|---|---|---|
| १) | संपादकीय | गुरुपौर्णिमेचा संदेश |
| २) | श्री. पाठकसाहेबांना भावपूर्ण निरोप | — |
| ३) | आपले नवे कोर्टरिसिव्हर श्री. क. हि. काकरे | — सदानंद चेंदवणकर |
| ४) | गुरुपूजा | — श्री. द. शं. टिपणीस |
| ५) | मशिदीत प्रगटला परमेश्वर | — |
| ६) | गाठीभेटी–४० संत गुलाबबाबा | — सदानंद चेंदवणकर |
| ७) | गुरुची आवश्यकता | — डॉ. के. भ. गव्हाणकर |
| ८) | व्यासपौर्णिमा — गुरुपूजेचा सोहळा | — |
| ९) | गुरुकृपा | — श्री. एन. जी. परुळेकर |
| १०) | प्रार्थना | — श्री. रमाकांत पंडित |
| ११) | शिरडीस प्रकटले बालरुपी भगवान | — श्री. साईदास मराठे |
| १२) | साईबिना दुनिया की दौलत मिले तो क्या | — श्री. जयवंत कुलकर्णी |
| १३) | साईमाऊलीची लीला | — श्री. प्रकाश किरण |
| १४) | असे माझे साई | — सौ. प्रितीप्रभा पाटील |
| १५) | साई देई मला दर्शन, साईस्तवन | — श्री. रमेश चव्हाण |
| १६) | साईकृपा | — कु. रजनी देशपांडे |
| १७) | जीवनपूर्ति | — सौ. माधुरी देशपांडे |
| १८) | इंद्रपुरी | — सौ. सरला गर्जे |
| १९) | कशी वर्णू तुझी थोर गाथा | — कु. वीना पत्की |
| २०) | साई, | — सौ. उषा अधिकारी |
| २१) | माझा साई | — सौ. उषा अधिकारी |
| २२) | शिरडी वृत्त | — |

## संपादकीय—

स. न. वि. वि.

# गुरूपौर्णिमेचा संदेश

गुरूपौर्णिमेचा दिवस हा गुरूपूजन करण्याचा. महर्षि व्यासविषयींची कृतज्ञता उत्साहाने साजरा करण्याचा. म्हणूनच या दिवसाचे आपणास आगळेपण जाणवयाला हवे. वर्षभर गुरू आपल्या शिष्यांना ज्ञान व शक्ती प्रदान करीत असतो. पण गुरूपौर्णिमेच्या या एकाच दिवशी गुरू शिष्याकडे काहीतरी मागत असतो. आजच्या दिवशी आपण सर्वजण आपल्या गुरूस असे मोलाचे काय देणार आहोत? असा प्रश्न प्रत्येक आर्त आणि जिज्ञासू साधकाने स्वतःस विचारला पाहिजे. वर्षभरात काही मौलिक व चिरंतन आपण आपल्या गुरूपासून घेतले असेल तरच खरी गुरूदक्षिणा या दिवशी आपण आपल्या गुरूस देऊ शकू. अशी जाणीव नसेल तर आपण रिक्त हस्तानेच आपल्या गुरूकडे जाऊ. आत्मचिंतन व समर्पण करण्याचा गुरूपौर्णिमा हा दिवस!

खऱ्या गुरूशिष्याचे ऋणानुबंध अति नाजुक व मानवी व्यवहाराच्या कक्षेपलिकडचे! नरनारायणाच्या या जोड्या. सहवासानेच त्यांच्यातील आंतरिक कप्पे उघडले जातात. खऱ्या शिष्याच्या अस्तित्वामुळे व जिज्ञासेमुळे गुरूच्या ज्ञानास अंकुर फुटतो व त्यास दृश्य आकार येतो. या दोघातील वैचारिक देवघेवीला उद्देशूनच "श्रोता वक्ताच दुर्लभः" असे म्हणता येईल. नाथसांप्रदायातील श्रीमच्छिंद्रनाथ व गोरक्षनाथ यांचे नाते असे अपूर्व होते. अशा थोर गुरूशिष्यांच्या परंपरेतून एक प्रयोगशील योगपरंपरा व थोर साधू या भारतात निर्माण झाले.

साधू हा योग परंपरेतील एक श्रेष्ठतम आदर्श प्रस्थापित करीत असतो. साधूच्या बाह्य पोशाखास अगर क्रियेला मर्यादित अर्थ आहे. त्यांचे श्रेष्ठत्व, त्यांचे साधुत्व वृत्तीत असते. साधुत्व ही, वासनास्पंदित देहापलीकडील वस्तू. मनाला सहजासहजी अनाकलनीय अशी साधुत्व वृत्ती. साधूच्या दिव्य वाणीतून जी उत्तरे येतात तो एक सहजबोध. या वाणीला अनुभवांची धार तर असतेच, पण त्याला आशीर्वादाचे तेज असते. साधूच्या वाणीला काल नेहमी पावन करीत असतो व पंचमहाभूते साक्षी असतात. अशा साधूचा सहवास हे एक दिव्य शिक्षण. असा सत्संग प्रयत्नानेच साधला पाहिजे. खऱ्या साधूचे चारित्र्य तो ब्रह्मलीन झाल्यावर सुद्धा हजारो वर्षे

सूर्यासारखे तळपत असते. आशीर्वादयुक्त व पुनीत जीवन साधूच्या हयातीत त्याला मिळू पाहातात. पण संस्कारविहीन असंख्य जीव कालचक्रात नुसते भ्रमण करीत राहातात. जगात विकसित न झालेले असे असंख्य जीव व उगाच गर्दी करून राहाणाऱ्या मुंग्या साधूला तारण्याच.

असे साधुत्व पचवण्यासाठी उत्कृष्ट दर्जाची सात्विकता साधकाने अंगी बाण वायला हवी. परोपकार बुद्धी, दया, क्षमा, शांती आणि धर्म ही भावंडे आपल्या-जोवती मिळविली पाहिजेत. जगाचे अनेक प्रहार आणि आघात सोसण्याचा दमदार-पणा स्वतःत निर्माण केला पाहिजे. विरोधी आणि अशुद्ध गोष्टी सहजासहजी पचविता आल्या पाहिजेत. दैनंदिन संघर्षांना व संकटाना तोंड देऊन काही झालेच नाही, घड-लेच नाही इतकी मनाची उंची व आनंद स्वतःत स्थिरावला पाहिजे. अशा साधकाला त्याच्या जीवनात ईश्वराचे संकलन झाल्यामुळे एक प्रकारची प्रौढावस्था, परिपक्वता व पावित्र्य प्राप्त होते. पण ज्ञान आले, सद्गुण विकसित झाले, पावित्र्य आले तरीही महत्त्वाची गोष्ट म्हणजे हा पावित्र्याचा कैफ पचविता आला पाहिजे, ही खरी श्रेष्ठ साधकाची कसोटी. तात्विक बैठक पचविण्यासाठी अहंकार अगदी शिथिल झाला पाहिजे. साधुत्वाच्या सुद्धा कसोट्या आहेत. खऱ्या साधूचा कस लागला पाहिजे. साधूला अनुसरणाऱ्या व विरोध करणाऱ्या पक्षाचे सुद्धा एकच विशिष्ट कार्य असते. येथे महत्त्व व्यक्तीला नाही. संघर्ष होणाऱ्या दोन सत्त्वांचा हा झगडा आहे. अशा दोन सत्त्वांच्या संघर्षातून कालाचे एक चिरंतन सत्य बाहेर पडत असते. साधूचे श्रेष्ठत्व अखेर त्याच्या त्याग–वैराग्यातच सिद्ध होते. साधू हा एक राजा अगर प्रजेच्या अधिकारक्षेत्रात हस्तक्षेप न करणारा आत्मा. त्याचे खरे नाते देवाशी. ते एका शाश्वत तत्त्वाशीच त्याचे अखण्डत्व होऊन गेलेली असते.

तेव्हा गुरुपौर्णिमेच्या दिवशी आपण आपल्या गुरूशी सत्संग साधू या. प्रत्येकाने सत्संग साधताना कोणत्या साधूची संगत करायची हे स्वतःचे मनाने ठरविले पाहिजे. सगळेच साधू सगळ्यांना पचत नाहीत. प्रकृतिधर्मानुसार ज्याच्या ज्या प्रकारच्या वृत्ती त्या प्रकारचा साधू त्याने शोधावा. पण हा सत्संग लाभण्यास जीवाला शांतता मिळाली पाहिजे. आजकाल आपण जीवनाच्या संघर्षात इतके गुरफटले गेलो आहोत की, वयाची चाळीशी, पन्नाशी गेली व साठी उलटली तरी आपल्याला जाग येत नाही. संसाराच्या व मायेच्या चक्रात जीव इतका दबून जातो की मृत्यूच्या शेवटच्या क्षणापर्यंत सुद्धा हे करावयाचे राहिले, ते झाले नाही असे म्हणत दुःखानेच तो निघून जातो. आपण जन्माला कसे आलो याची जाग प्रत्येकाला लवकर आली पाहिजे.

नाहीतर आम्ही सर्व गबाळेपणाने जगतो व मरताना रडतो. परंतु मृत्यू म्हणजे एका महायात्रेची सुरुवात.

गुरुपौर्णिमेचा दिवस आपल्या समग्र जीवनात जाग आणण्याचा क्षण. आपल्या गुरूच्या सत्संगात स्वतःला व गुरूला समजून घेण्याचा हा समय. अशी जाणीवपूर्वक व निष्काम गुरुदक्षिणा खऱ्या गुरूला समाधान देईल.


## संत चूडामणि भगवान श्रीसाईबाबा

### येत्या विजयादशमीस थाटात प्रकाशित होणार

लेखक

- श्री. का. सी. पाठक
  माजी न्यायालयधारक श्रीसाईबाबा संस्थान
- सदानंद चेंदवणकर
  कार्यकारी संपादक श्रीसाईलीला

★ श्रीसाईबाबांचे सचित्र चरित्र

★ श्रीसाईनाथकालीन व्यक्तींची भरपूर छायाचित्रे

★ श्रीसाईनाथांचे मुखपृष्ठावर मनोहर जपून ठेवण्यालायक चित्र.

प्रकाशक – पांडुरंग मोरे,
बॉम्बे नॅशनल प्रिंटर्स, मुंबई २१

# श्री. पाठकसाहेबांना भावपूर्ण निरोप

श्रीसाईबाबा संस्थानचे कोर्टरिसिव्हर साहेब व श्रीसाईलीला मासिकाचे प्रधान संपादक श्री. काशीनाथ सीताराम उर्फ भाऊसाहेब पाठक यांना महाराष्ट्र राज्य सरकारने ३१ मे १९७८ पासून सेवामुक्त केले याबद्दल समस्त साईप्रेमींना, साई-भक्तांना व संस्थानच्या सर्व कर्मचाऱ्यांना साहजिकच अतिशय वाईट वाटले.



श्री. पाठकसाहेब

मुंबापुरीतील साईभक्तांनी आमच्या दादर येथील साईनिकेतनमध्ये ता. १२ मे १९७८ रोजी सायंकाळी श्री. पाठक व सौ. इंदिराबाई पाठक यांना शाल, श्रीफल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करून त्यांच्या सत्कार्याचा गौरव केला, तर

शिरडी येथे दिनांक २५ मे १९७८ रोजी संस्थान कर्मचाऱ्यांच्यावतीने प्रिती भोजनाचा कार्यक्रम झाला व त्याच दिवशी सायंकाळी लेंडी बागेत झालेल्या सभारंभात त्यांना भावपूर्ण निरोप देण्यात आला. याप्रसंगी त्यांना चांदीची अर्ध्या-किलोची श्रीसाईबाबांची मनोहर मूर्ती सर्वांतर्फे कायम प्रेमाचे प्रतिक म्हणून भेटीदाखल देण्यात आली. याप्रसंगी न्यायाधिश श्री. एन. सी. पारीखसाहेब, डॉ. देशपांडे, श्री. भाऊसाहेब नागपुरे, श्री. तलगिरी, श्री. आठल्ये इ. ची श्री. पाठक गौरवपर भाषणे झाली व श्री. पाठकसाहेबांना सद्‌गदीत अंतःकरणाने निरोप देण्यात आला.

श्री. पाठकसाहेब हे मूळचे खानदेशातले. त्यांचा जन्म १३ मे १९१० रोजी तापी तीरावरील कुकुरमुंडे या गावी झाला. त्यांच्या मातोश्रीचे नाव जानकीबाई. त्यांचे वडील सीतारामपंत हे तलाठी होते. काशिनाथपंतांच्या वयाच्या आठव्या वर्षी त्यांच्या वडिलांचे देहावसान झाले.

घरच्या परिस्थितीमुळे किशोर भाऊंचे प्राथमिक शिक्षण अत्यंत कष्टात पार पडले. प्रसंगी धुळ्याच्या स्वोद्धारक अनाथालयात राहून त्यांनी मोठ्या जिद्दीने आपले शिक्षण पूर्ण केले. मुंबईच्या इलेक्ट्रिकल ग्रीड डिपार्टमेंट मधील सेवानिवृत्त इंजिनियर श्री. रंगनाथ विभांडीक हे त्यांचे बालपणीचे मित्र. एकमेकांचे हातात हात घालून ही दोघे शहाद्याच्या शाळेत जात व मन लावून अभ्यास करीत. पुढे दुय्यम शिक्षणासाठी कुमार भाऊ नंदुरबारला गेले व पुढे धुळ्याच्या जोधराज रामलाल हायस्कूलमधून मुंबई विद्यापीठाची मॅट्रिकची परीक्षा उत्तमप्रकारे उत्तीर्ण झाले. उच्च शिक्षणासाठी त्यांनी नाशिकच्या हंसराज प्रागजी ठाकरसी कॉलेजात नाव दाखल केले त्यावेळी त्यांना प्रा. रा. श्री. जोग संस्कृत शिकवीत असत. पुढे पुण्याच्या सर परशुरामभाऊ महाविद्यालयातून ते इंटर व बी. ए. पदवीधर झाले त्यावेळी श्री. करमरकर हे त्या कॉलेजच्या प्राचार्य पदावर होते. रॅ. शहा व प्रा. सबनीस यांचेही मार्गदर्शन कॉलेज कुमार भाऊंना त्यावेळी झाले. इंग्रजी हा भाऊंचा आवडीचा विषय. त्यावेळी इंग्रजीचे नामवंत प्राध्यापक श्री. बी. डी. सट्टेगिरी यांचे उत्कृष्ट मार्गदर्शन त्यांना लाभले व याचाच परिणाम म्हणून की काय भाऊ भावी आयुष्यात रुफाईदारपणे इंग्रजी लिहू-वाचू-बोलू लागले. बी. ए. उत्तीर्ण झाल्यावर त्यांनी सरकारी नोकरीत प्रवेश केला. आपल्या अंगच्या हुषारीमुळे सरकारच्या विविध खात्यातली उच्च पदे भराभर विभूषित केली. १९७० साली सेवानिवृत्तीचे वेळी ते महसूल खात्यात एक उच्च जबाबदार पदाधिकारी होते.

श्री. पाठकसाहेबांच्या चोख कारभारामुळे व कामे उरकण्याच्या तत्परतेमुळेच की काय सरकारने त्यांची नेमणूक नोव्हें. १९७० मध्ये श्रीसाईबाबा संस्थानचे कोर्टरिसिव्हर म्हणून केली. तेव्हापासून तो ३१ मे १९७८ पर्यंत ते या पदावर होते. या आठ वर्षांच्या काळात त्यांनी शिरडीच्या श्रीसाईबाबा संस्थानचा संपूर्ण काया-

पालट करून शिरडीला एक आगळेच स्वरूप आणले. श्रीबाबांच्या शिकवणुकीचा प्रसार–प्रचार करणे, त्याचप्रमाणे येणाऱ्या पै-पैशाचा सुयोग्य विनियोग करणे व भक्तांच्या सोयीकडे जास्तीत जास्त लक्ष देऊन त्यांना रहाण्या-जेवणाचे बाबतीत जास्तीत जास्त सोयी उपलब्ध करून देण्याचे फार मोठे कार्य श्री. पाठकसाहेबांनी आपल्या अल्प कारकिर्दीत केले.

पहाटेचा, रात्रीचा काळोख व त्यातच खडबडीत रस्ते यामुळे भक्तांना खूपच त्रास होत असे. त्यामुळे आरतीकरिता जाणाऱ्या दर्शनोत्सुक भक्तांचा त्रास वाचविण्यासाठी रस्ते संपूर्णपणे सिमेंट–काँक्रीटचे करून त्यावर भरपूर उजेड येण्यासाठी सर्वत्र प्रकाशनलिका श्री. पाठकसाहेबांनीच बसविल्या. भक्तांच्या वाढत्या गर्दीमुळे शौचमुखमार्जनाच्यासाठी भक्तांचा बराच वेळ वाया जात असे व त्यामुळे काकड आरती चुकते की काय अशी धास्ती भक्तांना वाटत असे. ही गैरसोय आता संस्थानने १६० संडास व २०० स्नानगृहे बांधून बऱ्याच प्रमाणात दूर केली आहे. एकावेळी होणारी पिण्याच्या पाण्याची गैरसोय लक्षात घेऊन संस्थान हद्दीत पाठकसाहेबांनी एकूण तीन विहिरी खोदण्याचे काम पूर्ण केले व पाणी साठविण्यासाठी एकूण ४०, ००० हजार गॅलन्सच्या पाण्याच्या दोन प्रचंड टाक्या बांधून जास्तीत-जास्त खोल्यातून पाणीपुरवठा करण्याची व्यवस्था केली. अलीकडील नूतन शांतीनिवास व लेंडी बागेतील साईनिवास या दोन वास्तूंमुळे भक्तांच्या रहाण्याची आणखीन सोय त्यांनीच करून दिली. शिरडीस सर्व थरातील लोक येत असल्यामुळे कमी खर्चाच्या लॉकर पद्धतीचा त्यांनीच अवलंब केला. संस्थान कर्मचाऱ्यांसाठी त्यांनी साईनगर वसविले. भक्तांसाठीच्या रहाण्याच्या बहुसंख्य खोल्यातून पंखे, पलंग व टेबल खुर्च्यांची व्यवस्था व त्याबरोबरच सर्वत्र स्वच्छता याकडे श्री. पाठकांनीच जातीने लक्ष दिले.

श्रीसाईनाथ रुग्णालयाला एक मजला वाढवून त्यांतून जास्तीत जास्त रुग्णांची सोय करण्याचा आदेश त्यांनीच दिला. शिवाय पुणे, नाशिक, नगर, औरंगाबाद येथील विविध क्षेत्रातील तज्ञ डॉक्टर मंडळी दर आठवड्याला इस्पितळात येतात व रोग चिकित्सा व शस्त्रक्रिया करतात. यामुळे बाबांची रुग्णसेवा ही शिकवण सातत्याने त्यांनी चालू केली आहे.

" विद्यादानासारखे दान नाही " असे बाबांनी म्हटले आहे हे लक्षात घेऊन श्री. पाठकसाहेबांनी ११ वी १२ वी चे वर्ग असलेली नवीन शाळा इमारत बांधून तिथे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना फी, रहाणे, जेवण-खाण इ. च्या सर्व प्रकारच्या सवलती विनामूल्य दिल्या. विद्युतघर, समाध्या लेंडीबागेची पुनर्रचना, छानदार दत्त-मंदिराची तिथे उभारणी, गरम पाण्यासाठी सूर्य उष्णोदके ( सोलर हिटर्स ) या गोष्टी पाठकसाहेबांनीच केल्या. शिवाय सर्व कर्मचाऱ्यांचे वेतन त्यांनीच बडकस कमिशन-

प्रमाणे ठरवून दिले व भावीकाळात राज्य सरकारी नोकरांच्या प्रमाणेच त्यांच्याही वेतनात बदल करण्यात येईल असे आश्वासन त्यांनीच दिले. सध्याच्या भोजनगृहात एका वेळी १६५ लोक भोजनास बसू शकतात या गैरसोयीमुळे श्री. पाठकांनी एकावेळी ५०० लोक बसू शकतील असे नवे विशाल भोजनगृह बांधण्याची सारी ती योजना, रूपरेषा तयार करून ती सरकारला दाखल केली व मंजूरी मिळवून कामही सुरू केले पण ही योजना साकार होण्यापूर्वीच त्यांना सेवामुक्त अवेळी व्हावे लागले आहे. यामुळे असंख्य भक्तांना सहाजिकच वाईट वाटले. पण नवे प्रशासक त्यांची योजना जलदगतीने उचलून धरून ती साकार करतील अशी अपेक्षा करावयास हरकत नाही.

श्री. पाठकसाहेब निस्सीम परमेश्वर भक्त आहेत. त्यामुळेच क्षेत्रस्थानी त्यांनी भक्तांच्यासाठी अनेक सुखसोयी उपलब्ध करून दिल्या. ते साहित्याचे भोक्ते आहेत म्हणूनच की काय श्रीसाईलीलेच्या इंग्रजी–मराठी अशा आवृत्त्या निघू लागल्या. साईलीलेच्या खपात व प्रचार-प्रसारात भरमसाट वाढ झाली व साईलीला लेखक-कवींची स्नेहसंमेलने शिरडीत भरू लागली हे विसरून चालणार नाही.

श्री. पाठकसाहेब स्वभावाने व वृत्तीने शांत असे सद्‌गृहस्थ. आपल्या मन-मिळावू धर्मामुळे त्यांनी आपल्या सभोवती असंख्य भक्तांचे मैत्रीचे धागे जुळविले. आपल्या कर्तव्यात दक्ष राहून त्यांनी संस्थानचा कारभार अत्यंत चोखपणे बजावला. या वयातही त्यांची स्मरणशक्ती तीव्र होती त्यामुळे आलेल्या गेलेल्यांची आपुलकीने विचारपूस ते करीत. त्यांच्या सुशील पत्नी सौ. इंदिराबाई यांनी त्यांना सर्व प्रकारचे सहकार्य दिले त्यामुळे सारी कामे ते यशस्वीपणे पूर्ण करू शकले. त्यांच्या कार्यात सौ. इंदिरा वहिनींचा सिंहाचा वाटा आहे. आपले पुत्र चि. अशोक, प्रकाश व सुहास आणि कन्यका सौ. प्रमिला यांना उच्च विद्या विभूषित करून त्यांना सुयोग्य मार्गाला पाठक दंपतींनी लावले आहे. आम्हीही श्री. व सौ. पाठक यांना श्रीसाई-बाबांनी उदंड आयुरारोग्य द्यावे. त्यांची नित्य भरभराट करावी अशी प्रार्थना श्रीसाई चरणाशी याप्रसंगी करतो आणि आधुनिक शिरडीचा शिल्पकार म्हणून मुक्तकंठाने त्यांची प्रशंसा करतो.

—कार्यकारी संपादक

---

**कुरुळीचे थोर नाथपंथी संत श्रीमाऊली महाराज यांची गाठभेट पुढील अंकी अवश्य वाचा.**

★

आपले नवे कोर्टरिसिव्हर साहेब

# श्री. कन्हय्यालाल काकरे

– सदानंद चेंदवणकर,
कार्यकारी संपादक, श्रीसाईलीला

श्रीसाईबाबा संस्थान शिरडी या जगत्प्रसिद्ध धर्मादाय धर्मक्षेत्राचे प्रशासन अधिकारी म्हणून महाराष्ट्र राज्य सरकारतर्फे नागपूरचे डेप्युटी चॅरिटी कमिशनर साहेब श्री. कन्हय्यालाल हिरालाल काकरे यांची १ जून १९७८ रोजी नेमणूक



श्री. कन्हय्यालाल काकरे

झाली आणि त्या आठवड्यात त्यांनी आपल्या अधिकारपदाची सारी सूत्रे हाती घेतली. आपल्या या पूर्वीच्या श्री. पाठकसाहेबांच्या प्रमाणेच श्री. काकरेसाहेब एक शांत, धीम्या वृत्तीचे पण कार्यतत्पर असे प्रशासन अधिकारी आहेत.

श्री. काकरेसाहेब हे मूळ मराठवाड्यातले. मराठवाड्यातील परभणी जिल्ह्यातल्या परभणीपासून सुमारे १२ मैलावर असलेल्या ठाकुरबुवांचे दहिठणा येथे त्यांचा जन्म १० मे १९२१ रोजी एका उच्चभ्रू घराण्यात झाला. त्यांचे वडील हिरालालजी तिथे शेती–सावकारी करीत. साहेबांच्या मातोश्रींचे नाव केशरबाई. त्यांना चंदुलाल, सुवालाल, छगनलाल व कन्हय्यालाल अशी चार अपत्ये झाली. यांपैकी चंदुलालजी आज हयात नाहीत. सुवालालजी हे सध्या माजलगाव येथे व्यापारी आहेत. छगनलालजी हे शेतीत रमलेले आहेत व कन्हय्यालालजी आता श्रीसाईबाबांच्या सेवेत कार्यरत आहेत.

श्री. कन्हय्यालालजींचे प्राथमिक शिक्षण दहिठणा व दुय्यम शिक्षण परभणीच्या गव्हर्नमेंट हायस्कूलमध्ये झाले. १९४० साली ते उस्मानीया विद्यापीठाची मॅट्रिकची परीक्षा उर्दू माध्यमातून उत्तीर्ण झाले. उच्च शिक्षणासाठी त्यांनी नागपूरच्या हिस्लॉप कॉलेजात प्रवेश केला व १९४२ साली ते इंटर झाले. त्यावेळी डॉ. केदार हे त्या विद्यापीठाचे कुलगुरु होते. पुढे ते शिक्षणासाठी म्हणून पुण्याला आले खरे पण याच सुमारास १९४२ ची छोडो भारत चळवळ सुरू झाली व त्यात त्यांनी थोडा फार सक्रीय भागही घेतला. फर्ग्युसन कॉलेजातून ज्युनियर बी. ए. चे वर्ष पार पाडले, व मुंबई विद्यापीठाची बी. ए. ची परीक्षा ते १९४५ साली नाशिकच्या हंसराज प्रागजी ठाकरसी कॉलेजातून अभ्यास करून ते उत्तीर्ण झाले. पुढे वकिलीचा अभ्यास त्यांनी केला व १९४७ साली ते मुंबई विश्वविद्यालयाची वकिलीची परीक्षा उत्तीर्ण झाले. लगेच त्यांनी परभणी येथे वकिली सुरू केली व १९४७ ते १९५० पर्यंत ते वकील म्हणून तिथे गाजले. याचाच परिणाम म्हणून की काय परभणी येथे १९५० ते १९५४ पर्यंत सुमारे पाच वर्षे पूर्ण वेळ ऑनररी सेकंड क्लास मॅजिस्ट्रेट म्हणून त्यांनी काम केले. १९५४ मध्ये हैद्राबाद राज्यात मुनसिफ मॅजिस्ट्रेट म्हणून त्यांची सेवा द्विभाषिक मुंबई राज्यात करण्यात आली होती. सिव्हिल व क्रिमिनल असे दोन्ही प्रकारचे कज्जे–खटले त्यांनी चालविले. पुढे १९५६ ते १९७० पर्यंत सिव्हिल जज्जसाहेब व पुढे चिफ ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट फर्स्ट क्लास या पदावर जालना, कन्नड, सटाणा, धुळे, कोपरगाव, आंबेजोगाई येथे त्यांनी काम पाहिले. १९६६ ते ६९ हा काळ ते कोपरगाव येथे व १९६९ ते १९७० हा काळ ते आंबेजोगाई येथे होते. पुढे १९७० साली डिसेंबरमध्ये सिव्हिल जज्ज सिनियर डिव्हिजनच्या पदावर त्यांची बढती झाली. नांदेड व धुळे येथे सिव्हिल जज्ज सिनियर डिव्हिजन व चिफ ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट म्हणून १९७५ पर्यंत त्यांनी काम केले.

१९७५ च्या जुलै मध्ये नागपूरच्या स्मॉल कॉज कोर्टाचे न्यायाधिश म्हणून त्यांची पदोन्नती झाली व ऑगस्ट १९७५ मध्ये नागपूर विभागाचे धर्मादाय उपआयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली. त्यावेळी नागपूर, भंडारा, चंद्रपूर व वर्धा या चार जिल्ह्यां-वर त्यांचा अधिकार होता; व आता १ जून १९७८ पासून श्री. काकरेसाहेबांची श्रीसाईबाबा संस्थानचे कोर्टरिसिव्हर साहेब म्हणून नेमणूक करण्यात आली आहे, व आपल्या अधिकारपदाची सूत्रेही त्यांनी आता संपूर्णपणे घेतली आहेत.

श्री. काकरेसाहेब यांचा विवाह ते शिक्षण घेत असतानाच पुणे येथे १९४४ साली झाला. त्यांच्या पत्नी या बीडच्या कोटेचा घराण्यातील. सौ. काकरे यांचे नाव मानकुवरबाई असे आहे. त्यांनी १९४२ च्या स्वातंत्र्य संग्रामात उडी घेतली होती. त्या एक स्वातंत्र्य सैनिका आहेत. १९४२ साली मानकुवरबाईंना सासवडला अटक करण्यात आली व चांगले नऊ महिने येरवड्याच्या तुरुंगात ठेवण्यात आले होते. तिथे प्रेमा कंटक, कमलाबाई अष्टपुत्रे यांच्याशी त्यांची चांगलीच गट्टी जमली होती. काकरे दांपत्याला एक कन्या व दोन पुत्र एवढी अपत्यसंपदा आहे. कन्या कुमारी कल्पना आता सौ. रत्नावली छाजेड या नावाने ओळखली जाते. त्यांचे पती श्री. रमेशचंद्र छाजेड हे सिव्हिल इंजिनियर असून ते राहुरीला असतात. सौ. रत्नावलींचे शिक्षण बी. कॉम परीक्षेपर्यंत झालेले आहे. रिसिव्हर साहेबांचे ज्येष्ठ पुत्र चि. प्रकाश हे आंबेजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ रूरल मेडिकल कॉलेजात ~~तिसऱ्या वर्षाचा~~ अभ्यास करीत असून ते हसतमुख व सुस्वभावी आहेत. गीतारवादनाचा त्यांना छंद आहे. द्वितीय चिरंजीव किरण हे ~~नागपूरला बी. एससी.~~ चा अभ्यासक्रम पूर्ण करीत आहेत.

श्री. कन्हय्यालाल काकरेसाहेब बहुभाषाप्रेमी आहेत. इंग्रजी, मराठी, हिंदी, उर्दू, गुजराथी, मारवाडी या भाषा ते अस्खलीतपणे बोलतात, लिहितात. चित्रे काढणे, ती रंगविणे, छायाचित्रे घेणे याचा त्यांना जणू छंद आहे, तरूण वयात त्यांनी भरपूर व्यायाम घेतला. दंड, बैठका, मुद्गल, रोमनारिंग्ज, सिंगल बार, डबल बार यामध्ये ते निष्णात आहेत. ते श्वेतांबर जैन पंथाचे असून भगवान महावीरांचे अनन्य साधारण पूजक आहेत. ते थंड स्वभावाचे व प्रगतीशील वृत्तीचे सद्‌गृहस्थ आहेत. आपल्या आयुष्याची बरीच वर्षे न्यायाधिश म्हणून वावरले त्यामुळे तो अनुभव जमेस धरता कोणत्याही गोष्टींबद्दलचे 'जजमेंट' घेण्यास त्यांना मुळीच अवसर लागत नाही. निकट परिचयाची व आप्त मंडळी त्यांना काकाजी या नावाने संबोधतात.

श्रीसाईबाबा संस्थानचे न्यायालयधारक आणि श्रीसाईलीलेचे प्रधान संपादक म्हणून त्यांची आता नेमणूक झाली असल्याने ते आता श्रीसाई सेवेत रत झालेले

आहेत. त्यांच्या हातून श्रीबाबांची भरपूर सेवा घडो आणि श्रीसाईबाबा संस्थानचा आणखीन विकास व भरभराट होवो, संस्थानने यापूर्वीच्या प्रशासकांचेकडून सुरू केलेली नूतन भोजनगृहाची व भक्तांच्या निवासस्थानाची कामे जोरकस गतीने पूर्ण होवोत अशी शुभेच्छा व्यक्त करतो.

# शिरडीतील गुरुपूजा

-श्री. द. शं. टिपणीस
वजिफदार लॉज, गोखले रोड, ठाणे.

• यंदाचा १९७८ साली होणारा गुरुपौर्णिमा उत्सव हा ७१ वा उत्सव आहे. हा उत्सव खुद्द बाबांच्या प्रेरणेने १९०८ साली द्वारकामाईत चालू झाला. बाबांचे एक भक्त तात्यासाहेब नूलकर हे त्यावेळी शिर्डीस होते. बाबा त्यांना म्हातारा म्हणत. एके दिवशी सकाळी बाबा शामाला म्हणाले, "त्या म्हाताऱ्याला सांग की या खांबाची आज पूजा कर." असे म्हणत बाबा धुनी जवळील ज्या खांबाला टेकून बसत त्या खांबाकडे त्यांनी अंगुली निर्देश केला. माधवरावांनी नूलकरांना बाबांचा निरोप सांगितला. हा काय प्रकार आहे हे दोघांना उलगडेना. कारण त्यावेळी बाबांची पूजा आरती वगैरे मशिदीत होत नसे. ती पुढे सुरू झाली. नूलकरांच्या मनात आले की ज्या अर्थी बाबांनी आज पूजा करण्यास सांगितले आहे त्या अर्थी या दिवसाचं महत्व विशेष असलं पाहिजे. पंचांग पाहिले तो काय आश्चर्य! तो दिवस व्यास पूजेचा गुरुपूजेचा. दोघांना काय पण आनंद झाला. नूलकर पूजेच्या तयारीस लागले.

काही वेळाने शामा पुन्हा मशिदीत गेला; त्याला पाहून बाबा म्हणाले, "तो काय एकटा पूजा करतो? तुलाही करायला काय झाले?" बाबांच्या प्रेमातला शामा तो! तो एकदम म्हणाला, "आपण खांबाबिंबाची नाही बा पूजा करणार, पूजा करायची तर ती तुझीच करीन देवा." बाबा कबूल होईनात, बराच वेळ दोघांची हुज्जत झाली. शेवटी प्रेम व भक्तीचा विजय झाला. एकदाची बाबांची पूजा करण्याची परवानगी मिळाली. झाले. शिर्डीत होते त्या बाबांच्या प्रेमातल्या भक्तांना निरोप गेला. सर्वांनी मिळून बाबांची यथासांग पूजा केली. बाबांना वस्त्रे अर्पण केली. अर्थात

बाबांना त्याचे हो काय! केवळ भक्तांच्या प्रेमापायी, भक्तांच्या कल्याणासाठी बाबांनी प्रयाण कालापूर्वी १० वर्षे आधी ही पूजा सुरू केली. पुढे या पूजेचा थाट वाढत जाऊन आजच्या गुरुपौर्णिमेच्या नयनरम्य भव्य सोहळयात त्याचे रुपांतर झाले आहे. गंगोत्रीची भव्य पवित्र गंगा निर्माण झाली आहे.

## रथातून निघालेली पहिली मिरवणूक

१९१८ सालातील गुरुपौर्णिमा उत्सव हा बाबांच्या हयातीतील शेवटचा उत्सव होय. या वर्षी एक विशेष गोष्ट घडली. पाच-सहा वर्षापूर्वी इंदूरचे श्री. अवस्थी व श्री. रेगे वगैरे भक्तांनी एक रथ श्री बाबांना अर्पण केला होता. त्यातून बाबांची मिरवणूक काढण्याची परवानगी मागण्यास मंडळी आली पण ती मिळाली नाही. रथ तसाच द्वारकामाईत सभामंडपात पडून होता. फक्त आरतीच्या वेळी त्यात गाद्यागिर्द्या लोड ठेवून तो सज्ज करीत असत. १९१८ सालच्या गुरुपौर्णिमेच्या उत्सवात श्री. बुट्टी, म्हाळसापती वगैरे मंडळींनी फारच आग्रह केल्यामुळे बाबांची परवानगी मिळाली. सर्व भक्तांनाही रथाबरोबर जाण्याची बाबांनी परवानगी दिली. त्या गुरु-पौर्णिमेला तिसरे प्रहरी गावातून मोठ्या थाटात मिरवणूक काढण्यात आली. रथात बाबांच्या पादुका व तसबीर ठेवण्यात आली होती. रथातून निघालेली ही पहिली मिरवणूक. (सा. ली. व. ३०, अं. २ वरून)

## श्रीसाईबाबांच्या जन्मग्रामी स्मारक

मराठवाड्यातील पाथरी ग्रामस्थांच्या गेल्या २ जून १९७८ रोजी भरलेल्या सभेत श्रीसाईबाबांच्या जन्मस्थानी योग्य असे स्मारक उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयाची कार्यवाही करण्यासाठी श्रीसाई स्मारक समितीची स्थापना झाली आहे. पाथरी नगरपालिकेचे चीफ एक्झि-क्युटिव्ह ऑफिसर श्री. बिंदु हे समितीचे अध्यक्ष असून ॲडव्होकेट दिनकरराव चौधरी हे मुख्य कार्यवाह आहेत. श्री. विश्वास बाळासाहेब खेर हे या समितीचे एक सदस्य आहेत. श्रीसाईबाबांचा जन्म पाथरी या गावी एका भुसारी कुटुंबात झाला असा एक संशोधनपर लेख श्री. विश्वास खेर यांनी ४-४-७० च्या मुंबईच्या दैनिक नवशक्तीत लिहिला होता. त्यानुसार या स्मारक समितीने श्रीसाईबाबांच्या जन्मस्थानाची जागा प्रा. भुसारी यांच्याकडून विकत घेतली असून खरेदीपत्र रजिस्टरही करण्यात आले आहे.

# "माशिदीत प्रगटला परमेश्वर"

[ सुप्रसिद्ध शिरडीच्या साईबाबांच्या जीवनावरील लवकरच प्रसिद्ध होणाऱ्या कादंबरीचं पहिलंच प्रकरण आम्ही इथं उद्धृत करीत आहोत. लेखक आहेत महाराष्ट्रातील एक नामवंत चित्रपट दिग्दर्शक ! आज तरी त्यांचं नाव प्रसिद्ध करायला त्यांची परवानगी नाही. ]

सोनेरी लिंबोणीचं झाड ! शिरडी गावातल्या एका उकीरड्यावरचं !

सोनेरी ? होय सोनेरीच !

कारण दिवसाच्या दगदगीनं दमून भागून झोपलेल्या सृष्टीला जागविण्यासाठी चाहूल लागू न देता हलकेच वर वर येणाऱ्या रवीराजाच्या सोनेरी किरणांनी ते झाड न्हाऊन निघत होतं ! सूर्य किरणांच्या तिरक्या परावर्तनानं त्या नीम वृक्षाची हिरवीगार पानं सुवर्णमय भासत होती ! त्यातून प्रभातीच्या झुळझुळणाऱ्या मंद वाऱ्यानं त्यात जणु दिव्य चैतन्यच अवतरलं होतं !

काही तरी विशेष घडले आहे अशा भावनेनं आपल्या टपोऱ्या डोळ्यानी एक खार आपल्या पायात धरलेली लिंबोणीची फळं खायचं विसरून, त्या झाडावरूनच खाली टक लावून पाहत होती !

त्या झाडावरची एक पाल पण त्याच वेळी चुकचुक करीत होती !

चार पोपटांचा एक थवा त्याच झाडाला गिरकी मारून, सूर घेऊन, कर्कश आवाज करीत नेमका त्याच झाडावर येऊन बसला ! त्यांचीही दृष्टी झाडाखाली जाऊन तेही अवाक् झाले !

समोरून लहानग्या नान्याची आई त्याला हाताशी धरून, घाईघाईनं त्याला फरफटत ओढीत शेतावर जायला निघाली होती नान्याचा बाप गाजी चोपदार, रात्री राखण करायला शेतावरच झोपला होता. त्याची न्याहरी घेऊन ती निघाली होती.

उकीरड्यावरच्या लिंबापाशी ती आली अन् झाडाखाली नजर जाऊन तिथंच थांबली !

या सर्वांचं कारण एकच ! त्या लिंबाच्या झाडाखाली एक बाल-योगी पद्मासन घालून ध्यानस्थ बसला होता ! प्रणवमय नादब्रह्माच्या सूक्ष्म लहरींच्या आनंदसागरात डुबलेल्या या प्रति-ईश्वराला झाडावरच्या राघूंचा कर्कश कलकलाट, भावी शुभ-अशुभाचा संदेश देणाऱ्या पालीची चुकचूक, नान्याच्या अंगावर खेकसणाऱ्या त्याच्या आईचा आवाज, काहीही स्पर्श करू शकत नव्हतं !

गोदावरीचा पवित्र तट! थोड्याच अंतरावर भारताची ही गंगामैया संथपणे वाहत होती! अनंत काळापासून भगवत् भक्तीच्या गजराने दुमदुमलेली ही पवित्र भूमि! महाराष्ट्राच्या महान् संतांची ही जन्मभूमी, कर्म-भूमी, समाधि भूमी! आजही जागो-जाग त्या महान् आत्म्यांची पवित्र समाधि-स्थाने गोदावरीच्या परिसरात विखुरलेली आहेत!

पण आज या पवित्र स्थानी एक दिव्यात्मा खऱ्याखुऱ्या अर्थात् समाधि-अव-स्थेत होता!

समाधि-अवस्था! वर्णनातीत मनाची स्थिती! मानवी शरीरातील चैतन्याचं दिवेल शोषून घेऊन स्वतःच आत्म-ज्योत दिव्यत्वाने प्रज्वलीत झालेली असते ती स्थिती! शरीर अचल, मन निश्चल, आत्मा अविचल!

शिरडी गाव एक पवित्र भूमीच आहे! प्राचीन भारतात शैलधी म्हणून तिचा उल्लेख आहे. शीलधी! भगवान शिवाचा निवास! अनेक संत महात्म्यांचे आगमन अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगाव तालुक्यातल्या या लहानशा खेडेगावी नेहमीच होत असे. स्थानाचा महिमा असेल कदाचित! गावात गणपतीचं, महादेवाचं, मारुतीरायाचं, शनीचं आणि खंडोबाचं– अशी देवळं त्यात विखुरलेली होती. शिवाय एक होती मशीद–जुनी–पडझड झालेली!

आल्या गेल्या महात्म्यांचे आदरातिथ्य या गावी हमखास होतच असे! त्यातून या बाल–योग्याचं व्यक्तिमत्व आगळंच–असामान्य होतं! बाल्य ओलांडून षोडशीत प्रवेश केलेला हा तरुण योगी ज्ञानेश्वरांचा जणु अवतारच वाटत होता!

त्याच्या आगमनाचं वृत्त वीजेच्या गतीनं गावात पसरलं!

खेड्यातील साधीभोळी श्रद्धाळू माणसं! वेदान्त न शिकताच माणसा-माणसात देवाचा साक्षात्कार शोधणारी! उत्साहानं भराभर गोळा झाली! मुलं-बाळं, मुली-बाळी, तरुण-ताठे, म्हातारे-कोतारे -- सर्वच! नव्या देवाचे दर्शन घ्यायला!

आणि देवच होता तो! मानवदेही देव! परमात्मा!

दिव्यत्वाचं तेज नखशिखान्त त्याच्या देहावर तळपत होतं! त्या तेजानं शर-मिंदा झालेला रवीराज लाललाल दिसत होता! तिथून काढता पाय घ्यावा म्हणून भराभर आकाशगमन करू लागला होता!

बाल योग्याची प्रभा शीतल होती – शांत होती! रवीराजाची किरणं तापू लागली होती!

रोज उगवत्या सूर्याचं सर्वप्रथम दर्शन घेणारी ही गावकरी मंडळी आज आपली दैनंदिन सवय सोडून या योगी–भास्कराचं दर्शन घेण्यात आनंद मानीत

होती. प्रभातीच्या किरणात त्याचं कोवळं वय, त्याची दिव्य तेजःपुंज काया, त्याची ध्यानातील तन्मयता– सारंच मोहिनी घालत होतं त्यांच्यावर !

आपणच या अवताराचा प्रथम शोध घेतला या अभिमानानं झाडावरची खार हे सारं कौतुकानं पाहत होती.

शेतांवर जाणारी शेतकरी मंडळीही तिथंच रेंगाळली होती.

संत महाराजांच्या पालखीत पुढाकार घेणारे गणपतराव कोते पाटील तिथं येऊन पोहोचले होते. त्यांच्या पाठोपाठ त्यांचा मुलगा तात्या आणि मुलाची आई बायजा धाईवाईनं तिथं आली.

योगी शांत होता, एकाग्र होता – ध्यानस्थ होता !

गावकरी अस्वस्थ होते. योग्याच्या कृपादृष्टीसाठी अधीर झालेले ते जीव चूप-चाप उभे होते. लहान मुलंसुद्धा न सांगताच निःस्तब्ध उभी होती. कारण या सर्वांना त्या देवाची कृपा हवी होती–रोष नको होता !

प्रहर ! दोन प्रहर ! वेळ भराभर धावत होती ! जणु काय मत्सरानं पेटलेला तो सूर्य दिवसभर त्या देवाकडे टक लावून पाहणाऱ्या त्या भोळ्या गावकऱ्यांना जाळून भस्म करण्याच्या हेतूनं आज अधिकाधिक प्रखर तेजाचा मारा करीत होता ! पण त्यातही अयशस्वी ठरल्यानं, लाजेनं डागाळलेलं आपलं तोंड रजनीराणीच्या कुशीत लपविण्यासाठी तो आता भराभर पश्चिम दिशेला पळत सुटला होता !

बेभान झालेले गावकरी ! पण त्यातही एक भोळं मातृहृदय जागरूक होतं ! तात्या कोतेची आई बायजा ! योग्याच्या तळमळत असलेल्या आत्म्याची भूक तिला जाणवली ! ती पुटपुटली,

'हत् मेल्यानो, पोर उपाशी हाय नव्हं का !'

धावत गेली – धावत आली ! दोन भाकऱ्या भाजून – खमंग चटणी वाटून ! बोलली,

'ए बाबा, अरं वेड्यावानी किती वेळ ध्यान लावून बसणार देवाचं ? अन् तुला रं काय करायचंय् देवाचं ध्यान ? तूच तर देवावानी दिसतोयस् की !'

बालयोगी भानावर आला ! समाधीच्या सत्य स्वप्नातून जागृतीच्या मायावी जीवनात !

झाडावरची पाल चुकचुकली !

'बायजामाय, अल्ला तेरा भला करेगा ! कशाला इतकी तकलीफ घेतलीस ?' बालयोग्याचे पहिले उद्‌गार !

'आरं ! तुला माझं नाव बी ठावं हाय ?'

'त्या पालीनं सांगितलं बघ तुझं नाव ! राहू दे ते ! आण इकडं ती भाकूर ! ही चतकोर बस !'

'अरे बाबा, इन तीन होत भाकऱ्या आपल्या भाजून! त्यातून फक्त चत-कुरच तू घेणार? साऱ्या दिसाचा उपाशी होयेल तू...'

'बायजा माय, माझा भाऊ उपाशी आहे! इकडं यायला निघालाय!'

चकीत झालेले गावकरी इकडे तिकडे पाहू लागले! त्याना त्या योग्याचा भाऊ कुठेच दिसेना! दुरून एक डुक्कर नाच पळत पळत तिकडेच येत होतं. पायात पाय अडखळत होते त्याचे. एक कावळा काव काव करीत त्याच्या भोवती घिरट्या घालीत होता. सरळ गर्दीत घुसलं ते अन् त्या योग्यापाशी येऊन उभं राहिलं. योग्यानं आपल्या हातातील भाकऱ्या त्याच्या पुढं केल्या अन् त्यानंही त्या मटामट फस्तही केल्या. शेवटी राहिला एक चतकुर तुकडा. त्यानं हुंगला पण खाल्ला नाही. त्या योग्यानं तो खाऊन टाकला!

ते पाहून एका ब्राम्हणाचं पोर 'शी शी' करीत तिथून पळालं. पण सारा गाव हे सारं कौतुकानं पाहत होता. त्यातील अनुभवी म्हाताऱ्याना संतांच्या जाती आणि संतांच्या रिती माहीत होत्या.

इतक्यात एका परिचित आवाजानं ललकारी दिली!

'ईश्वर असे सर्वांतरी—
  जाणीव ज्यासी असे अंतरी
तो हा महापुरुष अवतारी
  शिरडीमाजी पातला!'

गावकऱ्यांचे श्रद्धास्थान असलेले पुणतांब्याचे गंगागीर बाबा आज फार दिव-सानी शिरडीत आले होते. एकाएकी कुठून आले ते कळले नाही—पण निघून गेले झंझावातासारखे! एका महान सत्याचा जयघोष करून! पाठोपाठ गावकरीही त्यांच्या दर्शनासाठी झुंबड करून धावले.

निस्तब्ध शांतता पसरली काही वेळ!

राघू आवाज न करता निघून गेले!

खार तुरतुर आवाज करीत सरकली अन् दिसेनाशी झाली.

घारही पळाली—अन् पळत आलेला डुक्कर तृप्त होऊन शेपटी हालवीत सावकाश निघून गेला.

राहता राहिली गणपत कोते पाटील, त्यांची बायको बायजा, मुलगा तात्या, नाना चोपदाराची आई मुलासह आणि खंडोबाच्या देवळाचा पुजारी म्हाळसापती.

भारावून गेलेला हा देवमाणूस न राहवून त्या बालयोग्याच्या पायावर डोकं ठेवता झाला.

योग्यानं पाय झटकन् मागे घेतले.

'भगत, भगत, म्हाळसापती हे काय ? मी पण तुमच्यातला—तुमच्यासारखाच आहे रे ! वयानेही लहान— खुदाका बंदा !'

बायजाला राहवलं नाही. तिनं विचारलंच,

'पोरा, राग मानू नगंस ! चेहरा तुझा बामणाबानी हाय तेजस्वी, गोजिरवाणा ! कुन्या आईची कूस उजळलीस रे बाळा ? तुझा बा कोण ?'

'माय, मी तुझंच लेकरू आहे ग ! हा जसा तात्या— तसा मी.'

'खरं ! पर तुझं नाव काय ? गाव कोणतं ?'

'नावात काय आहे, माय ?' योगी उद्गारला. 'नाव मागं रहातं मेल्यावर. अन् गाव ? सारं विश्वच माझं गाव नाही का ?'

बायजानं ओळखलं हा पोर दाद लागू देणार नाही.

इतक्यात गर्जना झाली.

'मी सांगतो कोण आहे हा ! कुदळ आणा.'

म्हाळसापतीत खंडोबाचं वारं खेळू लागलं. खंडोबा मोठमोठ्यानं गर्जू लागले,

'कुदळ आणा. इथंच खोदा.'

लिंबाखालच्या उकीरड्यावरनं त्यानं योग्याला बाजूला ओढलं.

'खोदा इथं !' पुन्हा खंडेराव कडाडले.

तात्या धावत सुटला. कुदळ घेऊन आला. आणखीही गावकरी धावले.

घावावर घाव पडू लागले.

खंडेराव जोरात घुमतच होते.

काहीतरी अद्भूत घडणार असं गावकऱ्यांची मनोदेवता त्यांना सांगत होती.

मातीच्या ढिगाऱ्याखाली चिरेबंदी बांधकामावर घाव पडले. खळकन् आवाज झाला – अन् सारंच दृश्य बदललं.

एक मोठा नाग 'सूं सूं' करीत बाहेर आला. बाल योग्याकडं त्यानं टक लावून पाह्यलं– अन् शांतपणानं तो निघूनही गेला. कोणालाही इजा न करता.

सावधगिरीनं गावकरी भुयारात शिरले. हळूहळू पुढे झाले अन् आतील दृश्य पाहून अवाक् झाले !

सर्व बाजूंनी बंद असलेल्या या तळघरात चार भिंतीच्या चार कोनाड्यात चार पणत्या संथपणे जळत होत्या.

एक जपमाळाही तिथंच पाटावर पडली होती. त्यावर चार ताजी ताजी फुलेही वाहिलेली होती. नुकतीच कोणीतरी पूजा केली असावी असं वाटत होतं. वातावरण प्रसन्न आणि सुगंधानं दरवळून गेलेलं होतं !

हा चमत्कार पाहून मंत्रमुग्ध झालेले गावकरी धावत धावत बाहेर आले अन् त्यांनी बालयोग्याला गराडा घातला.

म्हाळसापती शुद्धीवर आले होते. त्यांनी बालयोग्याच्या पायाला मिठी घातली अन् आरोळी दिली,

'खंडोबारायांचा येळकोट!'

साऱ्या गावानं एकाच आवाजात येळकोट केला. 'जय मल्हार! जय खंडेराव!'

काशीराम शिंपी धीर करून पुढे झाला. म्हणाला,

'या गावात असा चमत्कार कधीच झाला नव्हता. खरं सांगा, आपण कोण आहांत ?

योग्यानं विषय बदलला. म्हणाला,

'हे माझ्या गुरूरायाचं स्थान आहे. ते आहे तसंच बंद ठेवा. बाहेरून बंद करून घ्या.'

'पण महाराज, ते दिवे?' अप्पा जागलेनं प्रश्न केला.

अप्पा जागले धार्मिक वृत्तीचा सात्त्विक माणूस! बाल योग्यातील दैवी तेजानं तो प्रभावित झाला होता.

'माझ्या गुरूरायानं ते लावून ठेवले आहेत. अखंड नंदादीप! सत्य, धर्म, शांती अन् प्रेम – या दिव्य तत्त्वाचं प्रतीक!' योग्यानं त्या दिव्यांचा अर्थच स्पष्ट केला.

'पण-पण महाराज,' गणपत कोत्यानी धीर करून विचारलं. 'ते आत्ताच जणु कोणीतरी लावलेले वाटतात.'

'अनादि काळापासून ज्वलंत राहिलेले हे नंदादीप– ईश्वरी कृपेची गुरुकिल्ली आहेत.' बालयोग्यानं स्पष्टीकरण केलं.

'पण महाराज, तुमचे गुरु इथे आहेत?' कोणीतरी प्रश्न केला.

'त्यांची समाधि आहे ही. अनेक जन्मापूर्वीची! ते भुयार पूर्ववत् बंद करून घ्या आणि पुन्हा खोदू नका. तुमचं कल्याण व्हावं असं वाटत असेल तर दर गुरुवारी आणि शुक्रवारी इथं ऊद जाळा!'

गावकऱ्यानी भुयार तसंच बंद केलं. ज्या उत्साहानं ती जागा खोदली होती त्याच उत्साहानं आदरपूर्वक त्यांनी ती बंदही केली!

आज योगायोगानं गुरुवारच होता! कोणीतरी ऊद आणला, विस्तव केला अन् त्यात तो घातला!

घमधमाट सुटला. उकीरड्यावर मांगल्याच्या मंदिराची पायाभरणी झाली. अनादि कालापासून भूमातेच्या उदरात झाकलं गेलेलं गुरुस्थान श्रद्धाळू मानवाला माहीत झालं. '

बाल योग्यावरील रागाला अनुरागाचं स्वरूप आलं अन् मावळतीला आलेला रवीराज झालं गेलं विसरून गेला ! आनंदानं त्यानं आपल्या कोवळ्या किरणांचा गुलाल चौफेर उधळायला सुरुवात केली. पुन्हा दुसऱ्या दिवशी त्या योग्याचं दर्शन घेण्याच्या मनीषेनं तो रजनीकडे निघून गेला !

पण दुसऱ्या दिवशी—अन् पुढील चार वर्षं—तो बालयोगी त्याला त्या ठिकाणी परत दिसला नाही !

गावकऱ्यांनी पण जंग जंग शोधलं !

बायजानं ताजी ताजी चटणी भाकर घेऊन सारं रान पार पाडलं ! तो षोडश-वर्षीय महात्मा अदृश्य झाला होता !

सन १८५४ सालची शिरडी गावातली ही घटना !

( सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन )

## श्रीसाई दुःख परिवार वृत्त

● आमच्या साईनिकेतन दादर कचेरीतील एकावेळचे अव्वल कारकून श्री. नारायणराव पिंपळखरे एप्रिल १९७८ चे अखेरीस श्रीसाईचरणी विलीन झाले.

● श्रीबाबांचे एक जुने भक्त श्री. कमलाकर गुप्ते उर्फ गुप्तेकाका वाकोला, सांताक्रूझ हे शिरडी येथे २७ मे ७८ रोजी रात्री १०-३७ ला हृदयक्रिया बंद पडून स्वर्गवासी झाले. त्यांची प्रकृती चांगली होती. सकाळी त्यांनी श्रीअभिषेक, श्रीसत्यनारायण केला. रात्री १० ची शेजारती करून प्रसाद घेऊन ते भक्तनिवासमध्ये गेले. पत्नी व नातू यांना प्रसाद दिला व अचानकपणे ते बिछान्यावर कोसळले व त्यातच त्यांचे देहावसान झाले. त्यांचे वय ७० वर्षांचे होते.

● साईभक्त श्री. राम देसाई यांच्या सुविद्य पत्नी सुलोचनाबाई, मु. वांद्रे, मुंबई या १६ मे ७८ रोजी दुपारी ३–३० वा. दीर्घ आजारानंतर साईचरणी विलीन झाल्या. गेल्या कोजागिरीस त्यांनी आपल्या निवासस्थानी श्रीबाबांची द्वारकामाईतील प्रतिमेची स्थापना केली होती. गेल्या एप्रिलमधील साईभक्त मंडळाचे स्नेहसंमेलन त्यांच्याच घरी साजरे झाले होते.

# श्रीसाईनाथ स्मरणिका

## जाहिरातदारांना सुवर्णसंधी

श्रीसंत चूडामणि भगवान श्रीसाईबाबांचा साठावा निर्वाण महोत्सव येत्या विजयादशमीस येत आहे. हा सोहळा वर्षभर सर्वत्र साजरा होणार आहे. श्रीसाईबाबा संस्थान शिरडीने या निमित्य दोनशे पानांची मोहक, सचित्र व संग्राह्य अशी स्मरणिका प्रसिद्ध करण्याचे निश्चित केले आहे. ही स्मरणिका साईभक्तांना सप्रेम भेटीदाखल दिली जाणार असल्याने तिच्या सुमारे २५ हजारावर प्रती काढल्या जातील. या स्मरणिकेत भारतातील ज्येष्ठ व श्रेष्ठ अशा साईभक्तांचे, संस्थान हितचिंतकांचे श्रीबाबांच्यावरील वाचनीय लेख, शुभाशिष, संदेश इ. विविध अती उपयुक्त साहित्य असून काही पाने साईभक्तांच्या साहित्यासाठी राखून ठेवली आहेत. ही स्मरणिका भारतात व परदेशातही प्रसारित होईल.

या स्मरणिकेतील काही पाने खास जाहिरातीसाठी राखून ठेवली जाणार असल्याने साईभक्त उद्योगपती, व्यवसायबंधू, कारखानदार यांनी आपापल्या मालाच्या जाहिराती त्वरीत पाठवून आपली जागा आरक्षित करावी. जाहिराती पाठविण्याची अखेरची तारीख १५ **ऑगस्ट १९७८** ही आहे. **स्मरणिकेचा आकार ७½" × १०"** असा राहील.

साईभक्तांसाठी जाहिरातीचे सवलतीचे दर —

कव्हर पान क्रमांक २ — ८०० रु.
कव्हर पान क्रमांक ३ — ६०० रु.
कव्हर पान क्रमांक ४ — १००० रु.
आतील मजकूराचे पूर्ण पान — ५०० रु.
अर्धे पान — २५० रु.
एक चतुर्थांश पान — १२५ रु.

जाहिरातीचा मजकूर, ब्लॉक्स इ. सर्व साहित्य पाठविण्याचे पत्ते—

१) साईनाथ स्मरणिका, द्वारा श्री कोर्टरिसिव्हरसाहेब, श्रीसाईबाबा संस्थान, मु. पो. शिरडी, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर. ४२३१०९

२) श्रीसंपादक 'साईनाथ स्मरणिका,' साईनिकेतन, ८०४, बी. डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुं. ४०० ०१४

गाठीभेटी ४०

## वाढदिवसानिमित्य अभिनंदन लेख

# विदर्भाचे श्रेष्ठ संत श्री गुलाबबाबा

– सदानंद चेंदवणकर

आमचा भारत हा अनेक संतांची पुण्यभूमी आहे. विशेषतः आपल्या महाराष्ट्रात एकाहून एक श्रेष्ठ असे अनेक संत पुरुष जन्माला आले आहेत, येत आहेत. विदर्भामध्ये अमरावती नावाचा एक जिल्हा आहे. या जिल्ह्यात राष्ट्रसंत तुकडोजी व श्री संत गाडगे महाराज यांचा जन्म झाला. याच जिल्ह्यात दर्यापूर नावाचे तालुक्याचे ठिकाण आहे. या तालुक्यात शहानूर नदीचे काठी अंजनगाव सुर्जी नावाचे एक छोटे गाव आहे. श्रीसंत एकनाथांचा मठ याच गावात. या गावच्या पूर्वेस दोन मैलावर जागेश्वर भारती महाराजांचे टाकरखेड मोरे हे एक छोटे गाव आहे. शिवाजीच्या काळातील मोरे घराण्यातील लोकांचे हे गाव म्हणून मोऱ्यांचे टाकरखेड असे नाव या गावाला मिळाले.



**श्री संत गुलाबबाबा**

या गावात सीताराम साधुबुवा उमक व तानाबाई या नावाचे एक धार्मिक जोडपे राहात होते. या दंपतीला सात अपत्ये झाली. ज्येष्ठ कृष्ण द्वादशी शके १८५४ म्हणजे ३० जून १९३२ रोजी त्यांना एक पुत्ररत्न झाले. हेच अमोल रत्न म्हणजे आजचे विदर्भातले महान संत श्रीगुलाबबाबा होत. यशवंतराव, नारायणराव, गुलाबराव, रामराव, भीमराव, नर्मदाबाई, द्रौपदाबाई ही सीतारामबुवांच्या सर्व सातही अपत्यांची नावे होत. पण ही मुले लहान असतानाच सीतारामबुवा एकाएकी निधन पावले. आपला मुलगा गुलाब हा एक श्रेष्ठ संत म्हणून वावरत आहे हे पहाण्याचे भाग्य त्यांच्या नशिबी नव्हते. वडिलांच्या पाठोपाठ गुलाबच्या आईचेही काही महिन्यानी निधन झाले. गरीबीला कंटाळून त्या माऊलीने एका विहिरीत जीव दिला होता.

छोट्या गुलाबाचे शिक्षण टाकरखेडच्या शाळेत झाले. शाळेत एक सालस, मनमिळावू, आज्ञाधारक विद्यार्थी म्हणून गुलाब ओळखले जात. वर्गातल्या सर्व मुलात ते उठून दिसत. ते अतिशय प्रामाणिकपणे वागत. शाळेत ते लौकर येत व गुरुजींनी दिलेले शिपायाचे काम ते मनापासून करीत. स्वच्छतेची त्यांना आवड, वर्गात ते हुशार विद्यार्थी म्हणून ओळखले जात.

आवश्यक व जरूरीपुरते शिक्षण घेतल्यावर गुलाबनी आपले घर सोडले ते कायमचेच. अखिल मानव जातीच्या उपयोगासाठी म्हणून ते घराबाहेर पडले. त्यांच्यामध्ये असामान्य असे उपजतच गुण होते व त्यांचा त्यांना फायदा होऊ लागला. ते सर्वांशी आदराने, प्रेमाने वागत. अस्पृश्यता निवारणाचे काम त्यांनी प्रथम हाती घेतले. त्यांच्या मनात लहानपणापासूनच स्त्री जातीबद्दल अतिशय वंद-नीय व आदराचे स्थान आहे.

नारी नारी मत कहो, नारी है मर्दोंकी खान ।
जिस नारी से पैदा हुए रामकृष्ण हनुमान ॥

असे ते नेहमी म्हणतात. लहान असल्यापासूनच ते विविध प्रकारची वाद्ये वाजविण्यास शिकले. आजही सर्व वाद्ये ते निपुणतेने वाजवू शकतात. कोणताही अपरिचित भाविक त्यांचे जवळ गेल्यास मोठ्या प्रेमाने व वात्सल्याने ते त्याची विचारपूस करतात. त्यांच्या भजनाचा एक वेगळाच आनंद असतो व तो आनंद घेण्यात भक्तांना वेगळीच मौज वाटते. त्यांना रागावलेले असे कुणीच बघितलेले नाही. जो जो भक्त श्री गुलाबबाबांकडे आपल्या अडीअडचणी, रोग निवारणार्थ किंवा दुःखभार हलका करण्यासाठी भक्तिभावाने त्यांच्याकडे जातो त्यास त्यांची काही ना काही तरी प्रचिती येतेच येते.

अंगात सदरा, गुडघ्यापर्यंत नीट नेसलेले लांडे धोतर, डोक्याला व पायात काही नाही अशा थाटातली श्री संत गुलाबबाबांची हसरी, गोरीगोमटी, गोजिरवाणी सतेज मूर्ती बघून कुणाही नास्तिकाचेसुद्धा मस्तक त्यांचेसमोर नम्र होते. बाबांची मूर्ती छोटी असली तरी कीर्ती मोठी आहे. बाबांच्या व्यक्तिमत्वात चमत्कार, साक्षा-त्कार, उपकार आणि संस्कार अशा चार गोष्टी अंतर्भूत झालेल्या आहेत. त्यांचे हे चतुरंगी व्यक्तित्व खरोखरच विलोभनीय असे आहे. बाबांचे चमत्कार हे लोकांना प्रेरणा देण्यासाठी असतात ते प्रदर्शनासाठी नसतात. गुलाबबाबांनी अनेकदा ड्राय-व्हर नसतानासुद्धा मोटार चालविलेली आहे. कित्येकदा पेट्रोल नसतानासुद्धा मोटार मैल मैल अंतर पळवून दाखविली आहे. बाबांनी तर अगदी अलिकडे जीप गाडीत स्वतः पाठीमागे बसून व स्टेअरिंगवर ड्रायव्हर नसताना गाडीला सांगितले की तू एक मैल चल व आश्चर्याची गोष्ट ती जीपगाडी भिवापूर येथे ड्रायव्हरशिवाय आपो-आप फिरली व नेमकी एक मैलावर थांबली. हा एवढा मोठा जादूगार आहे की

त्यांच्यासाठी रेल्वे गाडी पुन्हा फलाटावर येऊ शकते. ट्रॅक्टर चालतात, फुले टाकताच गोड पाणी होऊ शकते. अशा एक ना दोन त्यांच्या चमत्काराच्या अशा किती तरी कथा आहेत.

मानव समाधानाने रहावा, त्याला आत्मिक शांती मिळावी म्हणून निर्गुण सद्गुणांनी सगुण रूप धारण केले. त्या सगुण रूपालाच श्री संत गुलाबबाबा असे म्हणावयास हरकत नाही. श्री गुलाबबाबा म्हणजे प्रेमळपणा, दयाळूपणा, आदर, भक्ति, नम्रपणा, अंतःकरणाचे विशालत्व, अंतर्ज्ञान, परदुःखाची जाणीव, समाधान, न्यायक्षमता, समता, त्याग, शांती, मानवता इ. गुणांचा जणू संगमच होय. आज ते नागपूर विदर्भातले एक श्रेष्ठ संत म्हणून ओळखले जातात. काटेल या ठिकाणी त्यांनी एक चांगला आश्रम बांधला आहे. दर महाशिवरात्रीस येथे मोठी जत्रा भरते व हजारो-लाखो भाविक बाबांच्या दर्शनाने कृतकृत्य होतात. तेथल्या कुंडात स्नान करतात आणि व्याधीमुक्त होतात. स्वतः गुलाबबाबा साईबाबांचे परमभक्त आहेत; उपासक आहेत. काटेल ही बाबांची कर्मभूमी आहे.

बाबांचे अंतरंग व बहिरंग तेजस्वी आहेत. आपल्या वाणीने ते दुसऱ्यांना फुलवितात. त्यांचे दर्शन एकदा जरी कुणी घेऊन गेले तरी पुन्हा पुन्हा त्यांच्या दर्शनाची इच्छा होतेच होते. बाबा हे गोरगरीबांना, दुःखीतांना प्रकाश दाखविणारा दीपस्तंभ आहेत. अशा या थोर विभूतीच्या चरणी त्यांच्या वाढदिवसानिमित्त विनम्र अभिवादन !

# अवधूतमहाराजांचे अकाली निर्याण

सद्गुरू संप्रदायातील एक अवतारी पुरुष श्रीअवधूतस्वामी महाराज यांचे शनिवार दि. २४ जून रोजी सकाळी १० वाजून ८ मिनिटांनी अकाली निधन झाले. निधनसमयी त्यांचे वय ७३ वर्षांचे होते. श्री केसकर महाराज यांचे अध्यात्मिक पुत्र व गजानन महाराज यांचे ते पट्ट शिष्य होते. आपल्या दादर येथील निवासस्थानी दत्तपीठाप्रमाणे त्यांनी अनेक दत्तपीठे स्थापन केली. श्रीअवधूत महाराजांनी लिहिलेले ग्रंथ म्हणजे मनोविजय, आनंदाचा कंद हरी हा, आनंदाश्रम, भजनावली हे प्रामुख्याने होत. त्यांची आध्यात्मिक नाटकेही लोकप्रिय झाली आहेत. त्यांचा परिचय लेख श्रीसाईलीलेत प्रकाशित झाला होता. ईश्वर त्यांच्या मृतात्म्यास सद्गति देवो ही साईचरणी प्रार्थना.

## बाबांनी सौभाग्य अलंकार परत दिला

१९७३ साली लग्नानंतर जुनारे दोन महिन्यांनी पोर्टट्रस्ट हरिवळाला जात असताना मला नकळत माझ्या पायातील एक जोडवे हरवले. जोडवे सौभाग्य अलंकार असल्याने व लग्नानंतर इतक्या थोड्या काळात ते हरवल्यामुळे मनाला चुटपुट लागली. घरी परतल्यानंतर श्रीसाईबाबांची मनःपूर्वक प्रार्थना केली व दुसऱ्या दिवशी त्याच रस्त्याने पुन्हा शोध करत करत चालत गेले तेव्हा आमच्या क्वार्टर्सजवळच्या चतुर्थ श्रेणीच्या कामगारांच्या क्वार्टर्सच्या कठड्यावर हरवलेले जोडवे उन्हात चमकत असताना दिसले. जोडवे परत करून श्रीबाबांनी मला आपल्या अस्तित्वाची जाणीवच करून दिली.

– सौ. सुनंदा अनिल रवाळ,<br>२१/२८२, बी. पी. टी. स्टाफ क्वार्टर्स<br>रेनॉल्डस् रोड, वडाळा (पूर्व),<br>मुं. ४०००३७

## श्री. एस. बी. गोडखिंडींचा राजिनामा

आमच्या शिरडी कार्यालयातील शासकीय अधिकारी श्री. शंकरराव गोडखिंडी यांनी आपल्या पदाचा राजीनामा ३१ मे रोजी दिला व स्वतःला सेवेतून मुक्त करून घेतले. श्री. गोडखिंडीसाहेब मूळ कर्नाटकमधले. कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजातून बी. एस सी. पर्यंतचे शिक्षण घेतल्यावर त्यांनी सरकारी नोकरीत प्रवेश केला. आपण बरे की आपले काम बरे या धोरणाने वागून त्यांनी सरकारी नोकरीतील अनेक उच्च व जबाबदारीची पदे विभूषित केली. जळगाव येथे मद्यालकरी या पदावर असताना कोर्ट रिसिव्हरसाहेब श्री. का. सी. पाठक यांचेशी त्यांचा परिचय झाला व तो दृढ झाला. मार्च १९७५ मध्ये श्री. गोडखिंडी सरकारी नोकरीतून सेवामुक्त झाल्यावर सरकारनेच त्यांची नेमणूक २५ नोव्हेंबर १९७६ रोजी श्रीसाईबाबा संस्थान शिर्डीच्या शासकीय अधिकारी पदावर केली. आपल्या आवडत्या पाठकसाहेबांचे हाताखाली काम करावयास मिळणार म्हणून त्यांना आनंद झाला व त्यांनी ती जागा स्वीकारली. या पदावर येण्यापूर्वी ते ठाणे येथे स्पेशल लँड रिक्विझिशन ऑफिसर म्हणून काम पहात होते. ७१ च्या निवडणुकीच्यावेळी त्यांनी उल्हासनगरला रिटर्निंग ऑफिसर म्हणून काम पाहिले होते. शिर्डीत गोडखिंडीसाहेबांनी केलेल्या चोख कारभाराबद्दल व इतर दक्षतेबद्दल संस्थान त्यांचे ऋणी आहे.

# गुरूंची आवश्यकता

—डॉ. के. म. गव्हाणकर, कुर्ला ७०

● मनुष्य कितीही बुद्धिमान असला तरी गुरु केल्याशिवाय त्याला खरे ज्ञान होऊ शकत नाही. अशी भारतात सार्वत्रिक मान्यता आहे. ज्याच्या ठिकाणी अहंकार नसेल आणि जो ज्ञानार्त असेल तोच गुरु करील आणि त्याच्याच ज्ञानाला काही आकार येईल म्हणून नामदेवाला गुरुविना 'कच्चे मडके' घोषीत करण्यात आले. म्हणूनच पंढरीनाथाने—विठ्ठल—नामदेवाला विसोबा खेचरांना गुरु करण्याविषयी पुनःपुन्हा स्वप्नादेश दिला.

'ओळख' खरी जाणीव अगर जागृतीवाचक शब्द अमोल आहे, गंगेचा शीतल प्रवाह झुळझुळ वहात आहे, सभोवार हिरवीगार वनराजी शोभत होती. श्री वाल्मिकीच्या पवित्र आश्रमात सीतामाई एकट्याच बसल्या होत्या. प्रभु रामरायाच्या आठवणीने त्यांचे हृदय घडीघडीला उचंबळून येत होते. इतक्यात बाहेरून मधुरध्वनी कानी पडला.

सीतामाई पहातात न पहातात तोच कुश-लवांनी धावत येऊन गळयास मिठ्या मारल्या. 'आई' आज आम्ही केवढी मौज धरून आणली म्हणून सांगू! त्यात एक शेपट्यासुद्धा आहे. सीतामाईंना प्रथम काहीसुद्धा उमगले नाही, परंतु नंतर मात्र शंका आली. त्या आश्रमात नित्य रामायणाचा अभ्यास वाल्मिकी लव आणि कुश यांचेकडून करवीत होते आणि रामरायाच्या भेटीचे दिवस तर आले होते. 'कुठे आहे रे ती मौज?' आईचे शब्द ऐकून ते दोघेही धावतच बाहेर आले.

थोड्याच वेळात कोणातरी दोघा व्यक्तींना ते बांधून आणीत आहेत असे सीतामाईंने पाहिले. त्या दोन व्यक्ती म्हणजे श्रीरामराय व लक्ष्मण आहेत असे पाहिल्यावर सीतामाईची धांदल उडाली. त्या पंचारती घेऊन धावल्या. लव-कुशांना काहीच कळेना. 'बाळांनो! अरे, हे तुमचे वडील व हा शेपट्या त्यांचा दास मारुतीराया.'

सीतामाईच्या नेत्रातून अश्रू वाहू लागले. रामरायाना बंधनातून मुक्त करून आश्रमात आणून आसनावर बसविले व त्यांची पूजा केली. लवकुशाना आपले हेच वडील कळल्यावर ते दोघेही रामरायांच्या मांडीवर चढून अंगास बिलगले व अगदी पुरातन ओळखीप्रमाणे गुजगोष्टी करू लागले.

श्रीरामरायांना ओळखले नव्हते तेव्हा त्यांच्याशी युद्ध केले. पण ओळख पटताच सलगीने लाडीगोडी करू लागले व रामरायांच्या अंकाचा आश्रय केला.

श्रीरामरायास त्यांनी प्रत्यक्ष पाहिले होते परंतु ओळख पटावयास सीतामाईचे शब्द लागले. सीतामाईच्या शब्दांनी त्यांना जीवनाधार भेटला.

संतजनहो, आपल्या प्रत्येकाच्या जीवनात असेच घडत आहे. आपले जीवित्व हे प्रभुच्या अंकावर नाचत बागडत आहे. निद्रा असो जागृती असो स्वप्न असो तो प्रभु सदय पित्याप्रमाणे आपल्या मानेखाली हात घालून प्रिय दृष्टीने अवलोकन करीत आहेत. परंतु जोपर्यंत आपणास त्याची ओळख नाही तोपर्यंत प्रभुविषयी आपलेपणा व आधार वाटत नाही. परंतु संतवचनानी-गुरुवचनांनी का ओळख पटली की जीविताचा केवढा पालट होतो, जिथे अंधार तेथेच प्रकाश, जिथे परकेपणा तिथेच स्नेहवत्सलता, जिथे रूक्षता तेथेच रमणीयता, जिथे निष्ठुरता तेथेच प्रेमोर्मि भेटतात. संतांची वा गुरुची वचने हीच खरी आप्त वाक्ये. ओळख पटली की संबंध सृष्टी पटते.

जीवाचे आणि प्रभुचे मूळचे जिव्हाळ्याचे नाते आहे पण ते कळावयाचे मात्र संतवचनाने. "राहेन आता तुमच्या संगे।" असे निळोबारायांनी म्हटले आहे. प्रभु जीवाकरीता केवढा आसावलेला आहे हे कळते. संत निजखूण दाखवितात. ती हीच. जीवा पैलाडीये खुणे। पावविले समर्थ खुणे। जीविताच्या पलिकडील प्रेमखुणा संत दाखवितात. हे सामर्थ्य गुरुचेच कोणी कसाही असो राजा असो, विद्वान असो, कलाकुशल असो, संग्रामशूर असो, पैलखूणेस पाठविण्याचे सामर्थ्य त्यांच्यात नाही. जो तो आपल्या कर्मात व ज्ञानात श्रेष्ठ एवढेच परंतु आपल्या शब्दांनी प्रभूस आलिंगन घडविण्याचे सामर्थ्य संत-गुरुचेच म्हणून जीवाचे ओळखीचे शब्द बोलणारे संत वा गुरु होत.

पुराणातील यक्रीत ऋषींची कथा या दृष्टीने विशेष लक्षणीय आहे. भारद्वाज नावाचे एक सज्जन भजन पूजनशील गृहस्थ होते. त्यांचा यवक्रीत हा पुत्र. ऋषी लोकात या पितापुत्रास मान्यता नव्हती. कारण त्यांनी वेदाध्ययन केलेले नव्हते, त्यामुळे एकदा त्यांचा अपमान झाला. महत्वाकांक्षी यवक्रीताने वेदाध्ययन करायचे ठरविले, पण कोणी त्याला शिकवीना. जे शिकवण्यास तयार होते त्यांच्याजवळ हा अंहकाराने जाईना. पण इच्छा प्रबळ होती तेव्हा त्याने उग्र तपश्चर्या आरंभिली.

एकदा इंद्र पृथ्वीवर संचार करीत असता त्याने यास पाहिले व तपाचे कारण विचारले. यवक्रीताने आपला सगळा वृतान्त निवेदन केला. तेव्हा इंद्र म्हणाला "गुरुसेवापूर्वक अध्यायन केल्यावाचून नुसत्या तपाने वेदांचे ज्ञान प्राप्त होणार नाही, परंतु इंद्राचे भाषण त्यास रुचले नाही.

यवक्रीताचा आश्रम नदीकिनारी होता. एके दिवशी एक ब्राह्मण दिवसभर त्या नदीत मूठ मूठ वाळू टाकीत बसला होता. यवक्रीताने पाहिले की दुसऱ्या दिवशीही त्याचा तोच क्रम चालू झाला. शेवटी न राहवून यवक्रीताने त्याला विचारले की, "हे तू काय करीत आहेस" ब्राह्मण म्हणाला, "मी या नदीवर सेतु बांधीत आहे." ते ऐकून यवक्रीतास फार हसू आले व तो म्हणाला, "वेड्या अशाने का कोठे सेतु तयार होत असतो? हे केवळ अशक्य आहे." त्यावर तो ब्राम्हण वेशधारी इंद्र म्हणाला, "अशाने जर सेतु होणार नाही तर गुरुसेवापूर्वक वेदांचे अध्ययन केल्यावाचून तुला ज्ञानप्राप्ति होणे कसे शक्य आहे? हे ऐकून यवक्रीत ओशाळला. तो इंद्राला शरण गेला. त्याने इंद्रालाच गुरु केले. इंद्राच्या आशिर्वादाने त्याला सर्व वेदांचे उत्तम ज्ञान प्राप्त झाले.

गुरु भेटावयाला आपणामध्ये भूमिका निर्माण व्हावी लागते. आपणाला वस्तु सुख देत नाहीत असे समाधान अशी अरुची निश्चयाने आपणात दृढ झाली पाहिजे तेव्हा गुरुला येण्याला मार्ग होतो. संत आपण होऊन खळांना शोधीत निघतात. श्री ज्ञानेश्वर महाराजांना खळ लोक आमचा दुष्टपणा जावो म्हणून मागावयाला कधी गेले नाहीत. त्यांनी आपण होऊनच दुष्टांचे दुष्टपणा जावो म्हणून कळकळ केली व आशीर्वाद दिला. जगाला ठाऊक नाही आपण बुडत आहो म्हणून! पण संतानी मात्र म्हटले, "बुडताहे जन न देखवे डोळा! हिताचा कळवळा येतो म्हणूनी!"

गुरु शिष्य हे अलौकिक नाते आहे. पितापुत्राचे नाते केवळ देहाचे आणि रक्ताचे आहे. पण गुरुचे नाते त्यापलीकडचे आहे. पिता देह देतो पण त्यावर संस्कार गुरु करतो. मनाची आणि बुद्धीची जडणघडण गुरु करतो. आत्म्यावर आलेले मळभ गुरुच्या कृपेने नाहीसे होते. "माझ्या पित्याने मला जीवन दिले पण माझ्या गुरुनी मला श्रेष्ठ जीवन दिले. हे जगज्जेता शिकंदराचे उद्गार याच अर्थाचे आहेत. एकलव्याची निष्ठा व अर्जुनाची एकाग्रता ह्या दोन्ही गोष्टी अत्यावश्यक आहे.

आपाद धौम्य ऋषींचे-अरुणी उपमन्यु आणि वेद असे तीन शिष्य होते. अरुणीला शेताला बांध घालण्यास सांगितले, तो स्वतःच आडवा झाला. उपमन्यूला गाई राखण्याचे काम दिले. आठवड्यानंतर पाहिले तर तो अगदी उल्हासात होता. धौम्यऋषींनी विचारले 'बा उपमन्यो! तू जेवण कोठे करतोस? तो म्हणाला 'मी माधुकरी मागतो" धौम्य म्हणाले हे ठीक नाही." मग तो गाईचे दूध पिऊ लागला. तेही धौम्यानी बंद केले. मग तो वासरांच्या तोंडातून निघणारा दूधाचा फेस पिऊन राहू लागला. तेही धौम्यानी बंद केले. भुकेने त्रासून त्याने अर्कपत्रे खाल्ली, त्यामुळे

तो अंध झाला आणि विहिरीत पडला, धौम्य ऋषींच्या कृपेमुळे, अश्विनीकुमार प्रसन्न झाले त्यानी उपमन्युला चर्मचक्षु दिले व ज्ञानचक्षु दिले. वेद यानीही कठीण परीक्षा देऊन गुरुंचे प्रेम संपादन केले व उत्तम ज्ञान मिळविले.

श्री हरी म्हणजे प्रेमस्वरूप अत्यंत निकट आहे. ज्याचे त्याचे आपल्यावर जे निरुपचार प्रेम आहे, ते श्री साई-विठ्ठल रूप होय. हे श्रीसाईरूप कोणापासून केव्हाही हलणारे नाही. काहीही न करिता ते जीवाला प्राप्तच आहे व काहीही केले तरी ते जीवाला सोडणे शक्य नाही. असा प्रिय प्रभु सतत निकट आहे. तो आपले रक्षण प्रेमाने करीत आहे. आई जशी न सांगता बाळावर प्रेम ओतते, तसा तो प्रिय विठू देहाच्या प्रत्येक स्पंदनातून ज्ञान, आनंद, स्वप्रेम ओतीत आहे. हे गोडीने स्मरणे हेच सर्वश्रेष्ठ सुख घेणे आहे.

गोचीड गाईच्या स्तनाजवळ असूनही त्याला अमृतरूप दूध भेटत नाही. त्याचप्रमाणे प्रेमस्मरणाखेरीज प्रेम काय आहे हे बोधात आल्याखेरीज प्रेम हे कष्टमय साधनानी मिळवू म्हणेल तर ते अशक्य ' सूळावरील पोळीच ' होय. प्रेमाचा उदय संत गुरु संगतीत व प्रेमस्मरण ( नामस्मरण ) यात आहे. ती संगती लाभावी असा अंकुश—खरी कळकळ—जीवामध्ये पाहिजे आहे, नित्य जागृती पाहिजे की आपले जीवन काय आहे, त्याला वस्तुतः काय हवे आणि ते चालले आहे कोणत्या दिशेने, इकडे चित्त नसता जे जे प्रयत्न घडतील ते ते व्यर्थ आहेत. गाडी सांधा बदलावयाला चुकली की ती कितीही धावो ती ध्येयापासून दूरच जाणार.

तुम्ही विषयाची गोडी मानला, त्यामागे धावला म्हणून प्रभु तुम्हाला उमगत नाही. पैशाची ओढ जेवढी वाढते, तेवढीच ती ओढ कोठून आली आहे हे पाहण्याची वाटत नाही. ती आवड स्वप्रेम सुखाची लहरी आहे हे न उमगता जीवाला प्रत्येक कर्मात गोडी वाटून त्यात तो शिणत असतो.

इतर वस्तूंची आवड त्याचे चित्त व्यापून असते. ती गोडी मूळात कोठून आली इकडे विचारच नाही. ' देव नलगे देव नलगे । साठविण्याचे रुधले जागे । कचऱ्याच्या पेटीप्रमाणे इतर पदार्थ-पात्राच्या गोडीने जीवात भेसळ झाली आहे, आणि प्रभु साठवण्याला जागाच राहिली नाही—मग प्रभु जवळ असला तरी तो उमगावा कसा ?

प्रभुसाई साधनकष्टांनी प्राप्त आहे असा परमार्थात धडपडणाऱ्या लोकांचा समज आहे. वास्तविक प्रभुसाई (प्रेम) सुखाला कष्टाची नड नाही. त्या प्रेमाची ओळख व त्या विषयी अनन्य रूची जीवितांत जागी होण्याची नड आहे. प्रेमसुखाची ओळख, ओळखीने प्रेमाचा आठव—त्याची गोडी व गोडीने त्या सुखाबद्दल ओढ

रहाते. त्या ओढीने प्रेमसुख वाढत रहाते त्यात इतर काही न आवडण्याची स्थिती येते. जीवाला आनंदाची जरूरी, आनंदाला जीवनाची, जीवनाला प्रियता आधार, व प्रियता स्वयंसिद्ध आहे. ही प्रत्यक्षता होय. हे प्रत्यक्ष दर्शन. निजस्वरूपाचे ठिकाणी रमणे ही प्रियता, हा खरा प्रेमसुख पंथ गुरु सान्निध्यातच अनुभवता येतो.

★

# व्यासपौर्णिमा - गुरुपूजेचा सोहळा

आमच्या सांस्कृतिक जीवनात गुरुपौर्णिमेच्या उत्सवाला विशेष महत्त्व आहे. जेथे जेथे ज्ञानदानाचे पवित्र कार्य चालू असते, त्या त्या ठिकाणी गुरुपूजनाचा सोहळा होतो;

**अज्ञानतिमिरान्धस्य ज्ञानाञ्जनशलाकया ।**
**चक्षुरुन्मीलितं येन तस्मै श्रीगुरवे नमः ॥**

या श्रद्धेने वर्षातून एकदा गुरुविषयीचा आदर या दिवशी उत्स्फूर्तपणाने व्यक्त होतो. आषाढ महिन्यातील कुंद हवेत हा दिवस चैतन्य लेवून येतो, अन्तर्मुख करतो. जीवनाचे अनुशासन करणाऱ्या जेवढ्या व्यक्ती, जी तत्त्वे, त्यांच्या ठायी मन विनम्र होते, भावांजली अर्पण करते.

भारतीय संस्कृतीने विश्वसंस्कृतीला अनेक विचारप्रणालींची, सनातन सत्यांची लेणी लेवविली आहेत. भारताचे गुरु महर्षी व्यास हे विश्वगुरु म्हणून अखिल मानवजातीला वंदनीय आहेत. श्रीकृष्ण उक्तीला त्यांनी गीतेचा आकार दिला, हा 'विश्वासि जाला उपकारु' म्हणून श्री ज्ञानेश्वर व्यासांना गौरवितात.

**ना तरी सकळ धर्मांचे माहेर ।**
**सज्जनांचे जिव्हार ।**
**लावण्यरत्न भांडार । शारदेचे ।**

या शब्दात ज्ञानेश्वरांनी व्यासप्रणीत भारतग्रंथाचा महिमा वर्णन केला आहे. महामती व्यासांच्या प्रतिभेचा स्पर्श झाला नाही असा एकही विषय विश्वात नाही, हे वचन तर प्रसिद्धच आहे.

'सर्व विद्यांचे मूळपीठ' मानलेली भगवद्गीता हा व्यासांच्या विशाल वाङ्मयसागरातला एक प्रवाह आहे. विशालता हा व्यासांच्या सर्व जीवनकार्याचा विशेष आहे. या वाङ्मयाच्या मूळ स्रोताशी मानवतेचाच विचार आहे. व्यासांनी मानवाचा

अतींद्रियाशी, अलौकिकाशी, असंख्याशी, अनिर्वाच्याशी संबंध जोडला आहे, यातच श्रीव्यासांच्या विश्वगुरुत्वाचे मर्म आहे. परिमित मानवाला अपरिमित ज्ञानाचा लाभ व्यासांनी करून दिला आहे. हे कार्य त्यांनी मातृवात्सल्याने, मेघाच्या दातृत्वाने, कळवळ्याने केले आहे.

'क्षके वेदतरोः शाखा दृष्ट्वा पुंसोऽल्पमेधसः ।

क्षीण 'मेधा' असलेल्या लोकांसाठी व्यासांनी वेदांची संगती लावली, व्यवस्थापन केले. अठरा पुराणे लिहिली. भागवत पुराणातून कृष्णभक्तिचे माहात्म्य पटविले, ब्रम्हसूत्रे लिहिली. व्यासांनी प्रतिपादिलेला वैदिक धर्म हा विश्वधर्म आहे. 'सर्व मानवकुल एक आहे. मानव्य हे सर्वश्रेष्ठ मूल्य आहे, हेच व्यासांनी उद्‌बोधिले.' व्यासांच्या प्रत्येक कृतीत मानवतेचे भान आहे. त्यांचे कार्य हे ईशकार्य आहे.

व्यासकार्याचा परिचय होणे, व्यास शब्दाचा अर्थ कळणे आणि व्यासतत्वाच्या आचाराला कुठेतरी स्पर्श होणे हीच गुरुपौर्णिमेची सार्थता आहे.

---

## श्रीबाबांच्या ६० व्या पुण्यतिथीनिमित्य एच. एम. व्ही. च्या ध्वनिमुद्रिका

श्रीसाईबाबांच्या येत्या ६० व्या महापुण्यतिथीनिमित्य मुंबईच्या हिज मास्टर्स व्हॉईस या सुविख्यात रेकॉर्डिंग कंपनीने चार ध्वनिमुद्रिका तयार केल्या आहेत. या चारही गीतांचे गायक आहेत श्रीसाईलीलेचे उत्साही कवी श्री. कालिंदी प्रसाद श्रीवास्तव. ही चारही गीते सुप्रसिद्ध गायिका प्रीतीसागर हिच्या सुमधुर कंठातून उतरलेली आहेत. या चारही ध्वनिमुद्रिकांतील गीतांच्या प्रथम पंक्ती अशा—

१) बाबा जाते द्वार द्वार, भिक्षा लेते एक बार
२) जब जब हमपे विपदा आई उदीहीने दिया सहारा
३) साईबाबा अन्तर्यामी, भाग्यविधाता अवघड दानी
४) साईकृपा करो गुरु देवा, अंगीकार करो ये सेवा

साईभक्तांसाठी म्हणून काही ध्वनिमुद्रिका सवलतीच्या दराने दिल्या जाणार आहेत. प्रत्येक ध्वनिमुद्रिकेची किंमत १३ रु. ५० पैसे राहील. ज्यांना या मुद्रिका हव्या असतील त्यांनी आपली नावे व पत्ते श्रीसाई इण्डस्ट्रीज, ५, पुष्पाविहार क्रमांक २, १५९ कुलाबा रोड, मुंबई ४००००५ ( दूर ध्वनि-क्रमांक २१२७०१ ) येथे पैसे पाठवून आरक्षित करावयात.

# — गुरुकृपा —

—श्री. एन्. जी. परुळेकर,
केदार, १७३ अभिनवनगर, बोरीवली

" गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णू गुरुर्देवो महेश्वरः
गुरुत्साक्षात् परब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः ॥ "

वाचकहो, गुरुकृपेने आणि गुरुंचे गुरु जगद्गुरु श्रीसमर्थ साईबाबांच्या कृपेने साईभक्ताना कोणतीही गोष्ट अशक्य नाही. भक्तांनी फक्त आपला भाव गुरुचरणी, साईचरणी सदैव वृद्धिंगत करीत राहिलं पाहिजे. 'जया मनी जैसा भाव तया तैसा अनुभव.' यास्तव केवळ गुरुकृपेचा दाखला म्हणून लिहितो.

" साईभक्तहो, गुरु म्हणजेच ब्रम्हा, विष्णू आणि महेश. फार काय गुरु म्हणजेच साक्षात परब्रह्म. गुरुमहिमा वर्णन करू म्हटल्यास शब्द तोकडे पडतात. अहो साक्षात्कारी संतांशिवाय परब्रम्ह्याचं वर्णन दुसरा कोण करू शकणार ? सामान्य माणसाला गुरुचं स्वरूप शब्दांकित करणं केवळ अशक्य.

परमेश्वराचा महान भक्त, संत नामदेव आपण जाणताच. साक्षात् परब्रह्म म्हणजे परमेश्वरच स्वतः सगुण रुपाने नामदेवाबरोबर भोजन घेत असे हे आपणाला माहीतच आहे, आणि त्याचबरोबर अशा संतश्रेष्ठ नामदेवाला संतसभेमधे संत गोऱ्या कुंभाराने कच्चा ठरविला ती गोष्टही आपण सर्व जाणता. या विरोधाभासाचं कारण काय ? याचं कारण एकच म्हणजे परमेश्वराबरोबर भोजन घेणाऱ्या नामदेवाला तोपर्यंत गुरु नव्हता. आणि सगुणरुपी परमेश्वरही गुरुची जागा घेऊ शकत नव्हता. शेवटी अशा संतश्रेष्ठ नामदेवाला गुरुसेवा करून गुरुपदेश घ्यावा लागला आणि त्यानंतरच तो पक्का संत ठरला. गुरुकृपा नसल्यामुळे नेहमी बरोबरच भोजन घेणारा परमेश्वर श्वानरुपाने आल्यावर नामदेवाने त्याला हाकलले. काय आश्चर्य पहा. गुरुकृपेच्या अभावी, देवाबरोबर भोजन घेणारा नामदेव देवालाच ओळखू शकत नव्हता. केवळ गुरुकृपा झाल्यावरच नामदेवाला सर्वांभूती परमेश्वराचें साक्षात्कारी ज्ञान झालें. श्रोतेहो आपलं सारं ज्ञान आणि सारी भक्ति एका गुरुकृपेशिवाय आपणाला मुक्तीप्रत नेऊ शकत नाही. भक्तशिरोमणी आणि ज्ञानियांचा राजा जो ज्ञानदेव त्यानेसुद्धा आपल्या वडीलभावाचं निवृत्तीनाथाचं गुरुत्त्व मान्य केलं आहे. गुरुकृपेमुळेच शिष्य हा गुरुपेक्षाही मोठा होतो—असं आपणाला दिसून येईल.

आता एक दुसरं उदाहरण पहा. ते आहे एकलव्याचं. गुरु द्रोणाचार्य कौरव-पांडवाना धनुर्विद्या शिकवीत होते. त्याचवेळी एकलव्य नावाच्या एका अनाथ पारधी मुलाला गुरु द्रोणाचार्यांकडूनच आपण धनुर्विद्या शिकावी अशी जबरदस्त इच्छा होती. परंतु तात्कालिन सामाजिक विचारधारणेप्रमाणे हीनकुलोत्पन्न पारध्याच्या मुलाला गुरु द्रोणाचार्य शिष्य म्हणून घ्यायला असमर्थ होते. तेव्हा त्या एकलव्याने गुरु द्रोणाचार्यांची मातीची मूर्ती स्थापन करून त्या मूर्तीसमोर आपल्या शरसंधानाच्या अभ्यासाला सुरुवात केली. त्याचा गुरुचरणी एवढा जबरदस्त भाव होता की थोड-क्याच दिवसात तो एक महान धनुर्धर झाला आणि पुढे शिकारीच्या एका प्रसंगी एका श्वापदाच्या मुखात एकाच वेळी असंख्य बाण मारून दाखवून एकलव्याने, गुरु द्रोणाचार्यांचा अत्यंत आवडता शिष्य जो महान धनुर्धर अर्जुन, त्याचा गर्व क्षणार्धात धुळीला मिळविला. महाभारतातील ही गोष्ट आपणा सर्वांना माहीत आहेच. मृत्ति-केच्या मूर्तीला गुरु मानून केवळ गुरुचरणी वाहिलेल्या दृढ भावामुळे एकलव्य हा सर्वश्रेष्ठ धनुर्धर होतो, आणि प्रत्यक्ष पांडुरंगाबरोबर भोजन घेणारा संत नामदेव गुरु-कृपेच्या अभावी कच्चा ठरतो. गुरु हेच साक्षात परब्रम्ह असल्यामुळेच हा विरोधा-भासाचा चमत्कार आपल्याला दिसून येतो.

गुरुचरणी दृढ भाव ठेवल्याने काय चमत्कार होतो ते आपण पाहिले. आता गुरुचे स्वरूप आणि गुरु शोधावा लागतो का याबद्दल थोडं विचारमंथन करू या. गुरु ह्या कल्पनेची नीट समज येण्यासाठी आणि त्याच्या स्वरूपाची नीट ओळख होण्या-साठी आपणाला थोडा वेळ पतिव्रतेच्या भूमिकेत जावे लागेल. पतिव्रता ही एक स्त्री म्हणून सामान्य असते. पण पतिचरणी वाहिलेल्या आपल्या दृढ भावामुळे ती तेज-स्विनी होते. तिच्यापुढे देवही नतमस्तक होतात. पतिव्रतेचा पती कोण आहे याला महत्त्व नाही. तर तिचा पतिचरणी भाव कसा आहे यालाच महत्त्व आहे. प्रभू राम-चंद्राची पत्नी सीता जेवढी महान पतिव्रता तेवढीच रावणाची पत्नी सती मंदोदरी ही पण महान पतिव्रता होती. कुठे मर्यादा पुरुषोत्तम राजा रामचंद्र, आणि कुठे दुराचारी रावण ! परत एकदा आपणाला विरोधाभासाचा चमत्कार दिसून येतो. पती कसाही असला तरी त्याच्या चरणी आपलं सर्वस्व वाहाणारी सती मंदोदरी ही प्रभू राम-चंद्रालाही वंदनीय होती हे लक्षात ध्या. सीतेप्रमाणेच तीही प्रभातकाली ज्यांचे स्मरण करावं अशा पंचकन्यांपैकी एक आहे याची आठवण ठेवा. या विरोधा-भासाच्या चमत्काराचं कारण म्हणजे सती मंदोदरीचा पतिचरणी वाहिलेला भाव. एकलव्याच्या अशा दृढ भावामुळेच मृत्तिकेच्या निर्जिव मूर्तीला गुरुपद प्राप्त झालं ही गोष्ट परत एकदा लक्षात आणा. वाचक हो आता आपणाला दिसून येईल की गुरुचे

गुरुपद त्याच्या देहात नसते. तर ते आपण गुरुचरणी वाहिलेल्या भावात असते. त्यामधूनच गुरुकृपा प्राप्त होते. जरा विचार केला तर सत्‌शिष्यच गुरू घडवितो हे आपणाला दिसून येईल. आईच्या पुत्रप्रेमाशी बरोबरी करणारे दुसरं प्रेम म्हणजे सद्‌गुरुचं शिष्यप्रेम होय. म्हणूनच की काय गुरुला गुरुमाऊली असं म्हणतात. आई या शब्दोच्चारापुढे प्रत्यक्ष परमेश्वरसुद्धा नतमस्तक होतो. पण प्रत्यक्षात आई म्हणजे कोण याचा जर आपण विचार केला तर ती फक्त एक स्त्री. मुलामुळेच तिला मातृत्व प्राप्त होतं. आईने मुलाला जन्म दिला हे जेवढं खरं आहे तेवढंच मुलामुळे तिला मातृत्वाचं महत्पद प्राप्त झालं ही पण गोष्ट खरी आहे. ज्याप्रमाणे आई मुलाला वाढविते त्याप्रमाणेच सद्‌गुरु शिष्याला घडवितो आणि त्याचबरोबर हेही लक्षात आणा की मुलाशिवाय जशी आईची कल्पना करता येत नाही, तद्वतच सत्‌शिष्या-शिवाय सद्‌गुरु ही पण कल्पना करता येत नाही. परत एकदा लक्षात आणा की गुरुचे गुरुपद हे त्याच्या देहात नसून ते सत्‌शिष्याच्या दृढतम अशा भावामुळेच संपन्न होत असते. शिष्य आरुणीची गोष्ट लक्षात आणा. धौम्य गुरुंच्या शेतातील पाणी अड-विण्यासाठी सर्व उपाय थकल्यावर तो पाण्याच्या बांधावर आडवा पडून राहिला आणि त्याने पाणी अडविले. केवढी ही गुरुभक्ती! अशा शिष्यांना गुरु शोधावा लागत नाही. त्यांच्याकडे सद्‌गुरु चालत येतो.'

भक्त म्हणून किंवा शिष्य म्हणून तुम्ही केवढे मोठे आहात याची कल्पना करा. अहो देवसुद्धा आपल्या भक्तांसाठी राबतो हे आपणास ज्ञात आहे. पण एका गुरुकृपेशिवाय मात्र आपणाला पूर्णत्व येणं शक्य नाही. गुरुकृपा होणं हे गुरुवर अवलंबून नसून ते भक्ताच्या भावावर, भक्तीवर अवलंबून आहे. मृत्तिकेच्या मूर्ती-मध्येही गुरुपद निर्माण होऊ शकते हे एकलव्याच्या उदाहरणावरून लक्षात येते. पण हे केव्हा शक्य आहे? इंद्राच्या वज्राघातानेही न डळमळणारा असा तुमचा भाव तुम्ही गुरुचरणी वाहाल तेव्हाच. मग तो गुरु देहाने कोणीही असो. तात्पर्य काय की सद्‌गुरु हा त्याच्या देहात नसून तो सत्‌शिष्याच्या भावात, गुरुभक्तीत असतो. जस-जसा आपला भाव गुरुचरणी दृढ होत जाईल तसतसे आपण गुरुकृपेला जास्त पात्र ठरू आणि तसतसे गुरुच्या आशीर्वादाने परमेश्वराच्या जास्त नजीक होत जाऊ. या उदाहरणावरून गुरुचे स्वरूप आणि महिमा जेवढा डोळसपणे आपणाला पटला असेल तेवढा शब्दांचा तार्किक काथ्याकूट करून पटणार नाही. गुरु हे साक्षात परब्रम्ह आहे, आणि तर्कबुद्धीने कोणीही परब्रम्हाला जाणू शकत नाही. परब्रम्हाची ओळख केवळ साक्षात्कारानेच होते आणि साक्षात्कार गुरुकृपेशिवाय होत नाही. असं त्यांचं परस्प-रावलंबित्व आहे.

# .... प्रार्थना ....

—श्री. रमाकांत पंडित
प्रभास्मृती, भाऊ दाजी रोड, माटुंगा, मुंबई–१९

● प्रार्थना हा देवाकडे जाण्याचा सर्वात चांगला मार्ग आहे. प्रार्थनेमुळे परमेश्वराच्या प्रेमाचा प्रतिसाद मिळवू शकतो. भक्त ह्या भाषेत देवाशी हितगुज करू शकतो. आपण निराधार आहोत असा अनुभव घेऊन इतरांना सोडून शेवटी सर्वस्वी ईश्वरावर भरवंसा ठेवणे याचे नाव प्रार्थना. स्वतःच्या दुर्गुणांचे चिंतन आणि परमेश्वराच्या उपकाराचे स्मरण हीच खरी प्रार्थना होय. परम कारुण्याने मारलेल्या हाकेला देव धावतो. ऐहिक सुखाची अपेक्षा न करता केवळ ईश्वरप्रेमासाठी केलेली प्रार्थना ही सर्वश्रेष्ठ प्रार्थना होय.

प्रार्थना सर्व धर्मियांना मान्य आहे. हिंदू वेद कालापासून प्रार्थना करीत आले आहेत. ख्रिश्चन लोक चर्चमध्ये प्रार्थना करतात. मुसलमान लोक नमाजरूपाने प्रार्थना करतात. सारांश प्रार्थना हे सर्व धर्मियांच्या धर्मजीवनाचे एक अविभाज्य असे अंग आहे. निरन्तर केलेल्या प्रार्थनेने अंतरात्म्याचे सामर्थ्य वाढते. प्रार्थनेने विचाराचे नियमन होते व आत्मशुद्धी होते. मन स्वच्छ, पवित्र आणि उन्नत होण्यासाठी परमेश्वराची प्रार्थना करावी.

प्रार्थनेमुळे जीवनातील सत्यासत्याची माणसाला जाणीव होऊ शकते. मानवी जीवनमूल्यांचा त्याला साक्षात्कार होतो. प्रार्थनेने कामक्रोधादी विकारांचा नाश होतो. माणूस निर्भय बनतो. दुःखाने खचून जात नाही व माणूस अन्तर्बाह्य बदलतो व चित्ताची एकाग्रता प्रार्थनेमुळे साधते.

प्रार्थनेमुळे वातावरणातील अशुभ विचारांचे परमाणू दूर करता येतात. वातावरण शुद्ध करता येते आणि आपल्या अंतरंगात असलेली पवित्र बुद्धी बाहेर येते व हृदयाला उत्साहित करते व आपल्या पावलेला वेग आणते. असह्य स्थितीत माणसाला प्रार्थनेमुळे सहाय्य मिळते. अंतःकरणापासून केलेली प्रार्थना आपली दिवसभर सोबत करते. प्रार्थनेमध्ये अंतःकरणाशिवाय शब्द असण्यापेक्षा शब्दाशिवाय अंतःकरण असणे अधिक चांगले.

तुमच्या तोंडातून प्रार्थनेचे शब्द निघताना मन अन्यत्र भटकत असता कामा नये. प्रार्थना म्हणजे ईश्वराच्या अनंत तत्त्वाशी लीन होणे. या लीनतेमुळे शक्तीचा संचय होतो. अहंकाराचा लोप होतो. मनुष्य ईश्वराच्या निकट जातो. प्रार्थनेने मनाला शांति, समाधान मिळते व नवजीवन उजळते.

प्रार्थना दोन प्रकारच्या असतात. वैयक्तिक व सामुदायिक प्रार्थना. वैयक्तिक प्रार्थनेने स्वतःच्या मनाचे उन्नयन होऊन परमेश्वर प्राप्ती होते. सामुदायिक प्रार्थनेने समष्टीच्या मानसिक शक्तीचे उन्नयन होते. महात्मा गांधींनी सामुदायिक प्रार्थनेला विशेष भर दिला होता. महात्मा गांधींनी प्रार्थनेला धर्माचा पाया म्हटले आहे. प्रार्थनेने हृदयात ईश्वरी तत्त्वाची जागृती होते. ज्याला ह्या ईश्वरी तत्त्वाचा ध्यास लागला आहे त्याने प्रार्थनेसारख्या सहज सोप्या साधनमार्गाचा अवलंब करावयास पाहिजे.

प्रार्थना म्हणजे मानव व देव यांच्यामधील संवाद. देव भक्तांना जोडणारी साखळी. जीवाकडून शिवाकडे नेणारी ऊर्ध्ववाहिनी गंगा. प्रार्थना जीवनाला व्यवस्थित व संघटित बनवते व मनुष्य अखंड यत्नशील बनतो.

प्रार्थना ही परमेश्वररुपी गंतव्याकडे जाणारी महायात्रा आहे. हा राजमार्ग आहे. विकास करण्याची ताकद प्रार्थनेएवढी कशात नाही. सर्वांनी एकाचवेळी एकच भावना मनात ठेवून केलेली परमेश्वराची प्रार्थना ही अवर्णनीय आहे.

## बंगलोर येथे श्रीसाई मूर्तीची स्थापना

श्रीसाई स्पिरीच्युअल सेंटर, त्यागराजनगर, श्रीसाईबाबा मंदिर रोड, बंगलोर येथे १० मे १९७८ रोजी सकाळी अक्षय्यतृतीयेच्या सुमुहूर्तावर श्री-साईबाबांच्या पूर्णाकृती पुतळयाची स्थापना करण्यात आली. हा पुतळा ऑल इंडिया श्रीसाईसमाजाचे अध्यक्ष श्रीसाईपादानंद उर्फ महामना श्रीराधाकृष्ण स्वामीजी यांचे शुभ हस्ते स्थानापन्न करण्यात आला होता. या प्रसंगी वैदिक मंत्रघोष सारखा चालू होता. या प्रसंगी संस्थेचा रौप्यमहोत्सवही साजरा करण्यात आला. या सोहळयाच्या प्रसंगी असंख्य साईभक्त हजर होते. संस्थेच्या इतिहासातील हा दिवस सुवर्णाक्षरात लिहिला जाईल इतका महत्त्वाचा आहे.

मुंबईहून या समारंभासाठी साईलीलेच्या इंग्रजी आवृत्तीचे संपादक डॉ. परचुरे, डॉ. के. म. गव्हाणकर, श्री. व सौ. इनामदार इ. मंडळी गेली होती. या समारंभात श्रीराधाकृष्ण स्वामीजी, डॉ. गव्हाणकर, डॉ. परचुरे, प्रि. एस. के. रामचंद्रराव यांची भाषणे झाली. श्री. सी. व्ही. भास्करराव यांनी आभारप्रदर्शन केले. संस्थेतर्फे एक सुंदर स्मरणिका व "टॉक्स विथ स्वामीजी" या दोन ग्रंथांचे प्रकाशनही करण्यात आले. सुमारे आठ दिवस हा समारंभसोहळा चालू होता व असंख्य भाविकांनी श्रीमूर्तीचे दर्शन या काळात घेतले.

# शिरडीस प्रगटले बालरूपी भगवान्

गोदाईच्या काठी पवित्र बालमूर्ती
   ही प्रगटली भूवरी.........
शिलधी ग्रामी साई प्रगटले
   बालरूपी भगवान
      शिलधी ग्रामी साई प्रगटले ॥ धृ० ॥

मूर्ती लाजिरी अजानुबाहू ।
   पुष्पांजली ही तयास वाहू ।
किर्ती तयांची सर्वेच गाऊ ।
   बालरूपी भगवान ॥ १ ॥

निंबतरूच्या छायेखाली ।
   बैसुनि राहे मानव वाली ।
निंब जाहले अमृत पळी ।
   बालरूपी भगवान ॥ २ ॥

अजब वही ती जनास वदली ।
   खोदून काढा मम गुरू सदनी ।
मानुनी घ्या तुम्ही सर्व सम वचनी ।
   बालरूपी भगवान ॥ ३ ॥

—श्री. **साईदास मराठे,** शिरडी.

# ॥ सांई बिना दुनियाँकी दौलत मिले तो क्या ॥

सांई बिना दुनियांकी दौलत मिले तो क्या
मनमें अगर भक्ति नहीं जींदगी मिले तो क्या

एक दिन तो सब छोडके जाना है अकेले
कोई भलाई की नहीं फिर बात रही क्या

मनमें अगर भक्ति नहीं जींदगी मिले तो क्या
मानवका जनम मिलके मानवता छोड दे

यूँ तो हम जीए जाएंगे ऐसे जीनेसे क्या
मनमें अगर भक्ति नहीं जींदगी मिले तो क्या

भक्ति करो सांई की और नेकिपे चलो
ये रख देंगे हाथ सरपे और चाहिये भी क्या

— श्री. जयवंत कुलकर्णी,
कुलकर्णी कुटीर, १० प्रार्थना समाज मार्ग,
विलेपार्ले, मुं. ५०

परम साईभक्त श्री. दत्तकुमार कळसकर

बोडके बिल्डिंग, मुलुंड (पश्चिम) यांचे अचानक देहावसान होऊन २९ जून १९७८ रोजी एक वर्ष झाले. त्यांना आमची साश्रुनयनांनी श्रद्धांजली.

— का. संपादक

# " साई माऊलीची लीला "

ही साई माऊलीची कृपा,
असे सदा सर्व भक्तावर्ती

भक्तांच्या हाकेला साई येई धावुनी
दुःखाचा सागर जाई पूर्ण आटूनी

ही साई माऊलीची कृपा,
साईची दृष्टी ती प्रेमळ,
करी भक्तजनांचा सांभाळ

उच्च, नीच भेद नाही साई पाशी
ही साई माऊलीची लीला अपरमपार

साई नाथ, साई बाबा तुज वाचूनी
आश्रय आम्हा भक्ता नाही,
ही सारी साई माऊलीची कृपा.

—श्री. प्रकाश किरण
दादर, मुंबई–२८.

# — असे माझे साई —

साई माझे बाबा साई माझे आई
तपस्वी ही कांती तेजस्वी हे डोळे,
धीरोदात्त ही मूर्ती साधे स्वरूप आगळे
साई अद्भूत चमत्कार, दाखवी भक्तांस वेगळे
साई माझे ईश्वर साई माझी माउली ॥ १ ॥

कमरेस वस्त्र साधे सफेद परिधान
अंगात कफनी सफेद असे साधारण
डोक्यास सफेद रूमाल, असे सर्वांस दर्शन
साई माझे गुरू साई माझे दैवत ॥ २ ॥

संकट येतां भक्तावरी, साई विविध रूपांत मदत करी
द्वारका माईतली ही उदी अनेकांचे रोगमुक्त करी
समाधी जरी असे शिरडी इच्छा साई भक्तांची पूर्ण करी
साई माझे आधार साई माझे सर्वस्व ॥ ३ ॥

—सौ. प्रीतीप्रभा दत्ताराम पाटील,
एफ १७ ए, एव्हरेस्ट हौसिंग सोसायटी,
सहकार नगर इमारत ३ जवळ,
चेम्बूर, मुंबई ४०००७१.

श्रीसाईल

# साई, देई मला दर्शन

देई मला दर्शन, । साई, देई मला दर्शन ॥
भाव भक्तीने तुझ्या भेटीला आलो मी शरण ॥धृ०॥

भक्त जनांची तूच माऊली
तुझ्या कृपेने मिळे साऊली
संकटाच्या वाटेवरती तूच आश्रयस्थान ॥ १ ॥

हाक ऐकता येशि धावुनी
रात्रंदिन भजतो म्हणुनि
तुझ्या दर्शना व्याकुळ झालो करू नको अनमान ॥२॥

❋ ❋ ❋

# — साईस्तवन —

हे साईनाथा ! दयेचा सागर !
काय वर्णू तुझा महिमा अपार ॥ धृ० ॥

पूजन करिता मनोभावे रे
संकट समयी धाव घेशि रे
भक्त रक्षका कृपा सिंधू रे
बुडतियाशी असे आधार ॥ १ ॥

भक्तांचा एक तूंच विसावा
तव चरणांची घडावी सेवा
करितो करूण स्वरांनी धावा
भाव भक्तीने जोडुनिया कर ॥ २ ॥

— श्री. रमेश डी. चव्हाण
साईनिकेतन, गुजरलेन
नवापूर जि. धुळे
पिन—४२५४१८

## ' साईकृपा '

शिरडीस जाता तहानभूक हरपते
मन माझे गुंतते श्री साईचरणाशी ॥ १ ॥

बाबांच्या नामस्मरणाने होईल उद्धार
जाईल विकार हा मनोहरिचा ॥ २ ॥

साईनाम घेता आबालवृद्ध तरती
चिर आनंद मिळविती साईकृपेने ॥ ३ ॥

बाबांच्यापाशी नास्तीकाची नसे बार्ता
नास्तीकही आस्तिक होती साईदर्शन घडता ॥४॥

— कु. रजनी देशपांडे
४१३/२० मुकुंद नगर,
' आश्रय ' ब्लॉक नं. ७ पुणे ९

* * *

## — जीवन पूर्ति —

तव स्मरण साईदेवा
मम अंतरीचा ठेवा ॥ १ ॥

तव चरणीचे सुवर्णरज
मम अंतरी चे अबोल गुज ॥ २ ॥

तव समाधिचा दिव्य स्पर्श
मनी सद्भावनांचा जल्लोष ॥ ३ ॥

तव तेजोवलयांकित मूर्ति
देखता वाटे मम जीवन पूर्ति ॥ ४ ॥

— सौ. माधुरी देशपांडे
४१३/२० आश्रय बंगला, मुकुंद नगर,
पुणे ९.

# — इंद्रपुरी —

शिरडी भासे इंद्रपुरी,
स्वर्गची अवतरला भूवरी ॥

हिरेजडित सिंहासनी,
साई बैसले सत्वरी ॥

उदबत्त्यांचा घमघमाट,
सडा रांगोळीचा तो थाट ॥
टाळ मृदंगाचा घमघमाट,
साई नामाचा जयघोष ॥

चला चला हो क्षणी जाऊ या,
साई चरण कमली मस्तक नमवू या,
बाबांचा कृपा प्रसाद मिळवू या,
जीवन सार्थकी लावू या,
जीवन उद्धरुनी घेऊ या ! !

—सौ. सरला सु. गर्जे
पुणे–५

## श्रीगुरुपौर्णिमा उत्सव

प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही श्रीगुरुपौर्णिमा उत्सव श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी तर्फे शिरडी येथे दिनांक १९–२० व २१ जुलै १९७८ रोजी साजरा होत आहे. तरी सर्व साईभक्तांनी हेच निमंत्रण समजून संपूर्ण कार्यक्रमास हजर राहून सर्वतोपरीने सहकार्य द्यावे अशी विनंती मे. कोर्टरिसिव्हरसाहेब श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी हे करतात.

# कशी वर्णू तुझी थोर गाथा

तुज शरण शरण मी श्रीसाईनाथा ।
कृपा करी देवा अनाथांच्या नाथा ॥ ध्रु० ॥

दीन दुबळा मी पामर ।
अफाट दयेचा तूं सागर ।
गंगा यमुना सुरेख संगम ।
हास्य कोरले हृदयीं नम्र ।

प्रसन्न धवल शुभंकर ।
निष्पाप मधु मनोहर ।
जिवलग ही भक्तांचा तूं
सकलांचा ही मायपिता ॥ १ ॥

दयाधीन तूं क्षमाशील तूं ।
सगुण रूप हे साई तूं ।
बुद्ध ख्रिस्त ही तुझीच रूपे ।
सारी सृष्टी तुझी स्वरूपे ।

चुकले माकळे क्षमा करी ।
साई तूं हृदयी धरी ।
चरणीं तुझिया ठेवुनि माथा ।
कशी वर्णू तुझी थोर गाथा ॥ २ ॥

—कु. वीना विश्वनाथ पत्की
ग. १७/१० राजर्षी शाहूनगर
माहीम धारावी, मुं. ४०००१७

# – साई –

साई माझी माता
साई माझा पिता
साई सर्वदाता जन्मोजन्मी ॥१॥

मुखी साईनाम
तेचि रामनाम
अन्य त्यावीण नको काही ॥२॥

नित्य साई छंद
मन होई धुंद
हृदयी आनंद निरंतर ॥ ३ ॥

साई माझा देव
हाचि माझा भाव
साई हीच ठेव मजलागी ॥ ४ ॥

रामरूप साई
कृष्णरूप साई
शिवरूप साई पावो मज ॥ ५ ॥

एका साईवीना
दुजे प्रिय नाही
अलंकार साई जन्मभरी ॥ ६ ॥

नको पुनर्जन्म
नको त्या यातना
पुरवी वासना साई देवा ॥ ७ ॥

## 'श्रीसाईलीला' येत्या अंकात–

तंडुल अवभ्राणाने पीडा जाणणारे श्री. सदाशिव दिगंबर उर्फ दाजीसाहेब जोशी यांचे संबंधीचा एक लेख आम्ही एप्रिल १९७८ च्या अंकात प्रकाशित केला होता. असंख्य भक्तांना त्यांचे संबंधीचे आलेले काही निवडक अनुभव ऑगस्ट ७८ अंकात प्रसिद्ध करीत आहोत.

–संपादक

# — माझा साई —

हृदयाच्या कोंदणात
साई कृपावंत
नित्य वास करीत, जाणते मी ॥

जगताचा ईश
एकच साईश
देईल आशीष, भक्तजना ॥

साई साई छंद
मना करी धुंद
निर्भर आनंद, मिळतसे ॥

साई नाम मुखी
तोचि सदा सुखी
साई सकला राखी, ध्यानी धरा ॥

माझा देव साई
त्याचे नाम ध्याई
तेचि तारक होई, भवसागरी ॥

साई रघुनंदन
साई करूणाघन
करील पावन, भाव मनी ॥

—सौ. उषा प्र. अधिकारी
सावित्री भुवन,
बंदररोड, रत्नागिरी

# शिरडी–वृत्त माहे मे सन १९७८

या महिन्यात शिरडीस श्रीसाईबाबांचे दर्शनाकरिता बाहेरगावची भक्त मंडळी फार मोठ्या बहुसंख्येने आली होती.

काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे :—

**कीर्तन :**— १) संस्थान गवई श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची कीर्तने नेहमीप्रमाणे झाली.

**प्रवचन :**- १) ह. भ. प. निवृत्तीराव पाटील, संत भाऊमहाराज पुण्यतिथी निमित्त प्रवचन झाले. २) स्वामी दिव्यानंद महाराज हृषिकेश ३) सौ. कुमुद क. खर्डीकर, इन्दौर. ४) श्री. साईनाथ जोशी, शिरडी.

**भजन, गायन** १) श्री. सदाशिव ह. देवळकर, कल्याण.
**वादन** वगैरे २) कु. विजया राधाकृष्ण, मद्रास.
३) सौ. सीतालक्ष्मी सुंदरेशन, पुणे. ४) कु. ललिता राधाकृष्ण, मद्रास. ५) श्री. एन्. डी. सुब्रह्मण्यन, पुणे. ६) श्री. पंडीत म. चिमोटे, गोरेगाव, मुंबई. ७) श्री. विपुल कुर्लेकर, गोरेगाव, मुंबई. ८) श्री. मनोहर रेगे, मुंबई. ९) श्री. जेठमल ब. चंदानी, मुंबई. १०) श्रीसाई भजन मंडळी, न्यू दिल्ली. ११) सौ. सुलभा र. जोशी, मुंबई. १२) श्री. लहानू नागपुरे, मुंबई. १३) श्री. गेंदामजी, मुंबई. १४) श्री. मुरलीधर श. पाटील, नगर. १५) श्री. नाथपंत भजनी मंडळी, मुंबई. १६) सौ. सुशिलाबाई जोशी, पुणे. १७) श्री. रुद्रमणी श. मिठारी, पंढरपूर. १८) श्री. श्रीधर क. जोशी, विलेपार्ले, मुंबई. १९) श्री. जगजीवनदास अमर संगीतालय, सुरत. २०) श्री. नवीनचंद्र लोहार, सुरत. २१) श्री. इच्छा श. जोशी, शास्त्रीजी २२) श्री. व सौ. अनुराधा पौडवाल. २३) श्री. अरुण पौडवाल. २४) श्री. उदय पौडवाल, मुंबई. २५) श्री इंद्र मुखी भजन मंडळी, पुणे. २६) श्री. राजू गु. भट, राजस्थान. २७) श्री. पांडुरंग ना. सुरवेकर, जि. नगर. २८) श्री. शिवाजी श. गुरव, जि. नगर. २९) श्री. बाबुराव खळदकर, पुणे. ३०) श्री. भास्कर वि. लेले, पुणे.

**माननीयांच्या भेटी :**—

१) मा. श्री. एन. के. पारेख, न्यायाधिश सिटी सिव्हिल कोर्ट, मुंबई.
२) मा. श्री. अभ्यंकर, निवृत्त न्यायाधिश, हायकोर्ट, नागपूर.
३) मा. श्री. बसाक IAS जिल्हाधिकारी, नासिक.
४) मा. श्री. डेकटे, कृषिमंत्री, सिंचनक्षेत्र विकास, महाराष्ट्र.
५) मा. श्री. चौधरी, न्यायाधिश सिटी सिव्हिल कोर्ट, मुंबई.

**हवापाणी :**– शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

# साईबाबा धर्मार्थ दवाखाना

( होमिओपाथिक )

## सर्व धर्मियाकरिता खुले

कृपया या संधीचा जरूर लाभ घ्यावा.

वेळ : रोज सकाळी १०-३० ते १२-३० सायंकाळी ४-३० ते ६-३०

रविवार व काही विशिष्ट सुट्टीचे दिवस सोडून

**आकार : दर दिवसास २५ पैसे**

नवीन पेशंटसाठी ५० पैसे नोंदणी फी आकारली जाईल.

**स्त्रियांसाठी खास स्त्री डॉक्टरांची सोय**

## साईबाबा धर्मार्थ दवाखाना

**( शामदासानी फौंडेशन )**

**नवजीवन हौसिंग सोसायटी,**

ब्लॉक नं. ३, रूम १०४,

लॅमिंग्टन रोड, मुंबई ४००००८

Regd. NO. MH/BYE/26

फोन : २५४३३७

श्रीसाईबाबा ट्युटोरिअल ॲकेडमीज्

इंटर आर्टस् क्लासेस (१९४३)

# स्पेशल इंटर आर्टसचे एकमेव क्लासेस्

**क्षत्रिय निवास, गिरगांव पोर्तुगीज चर्च, लाखाणी बुकडेपो समोर**

— वैशिष्ट्ये —

१) ३५ वर्षांचा इंटर आर्टस् परिक्षेचा खास अनुभव व वैयक्तिक लक्ष.

२) सर्व विषय संपूर्ण सायक्लोस्टाईल्ड नोटस्सहित शिकविले जातात.

३) युनिव्हर्सिटी परिक्षेकरिता अपेक्षित प्रश्न (सायक्लोस्टाईल उत्तरा-सहित) दिले जातात.

४) महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री नामदार श्री. शंकरराव चव्हाण, कै. नामदार श्री. भाऊसाहेब हिरे, चीफ जस्टीस ऑफ इंडिया नामदार श्री. वाय. व्ही. चंद्रचूड, मुंबईच्या स्मॉल कॉजेस कोर्टाचे चीफ जस्टीस श्री. नारायणदास शहा, प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट श्री. आठल्ये व भवन्स हजारीमल सोमाणी कॉलेजचे प्रिन्सिपॉल श्री. शशिकांत पारेख, अंबिका सिल्क मिल्सचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. सुरेंद्र मेहता, कामानी इंजिनिअरिंग कॉर्पोरेशनचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. नवीन कामानी इत्यादींच्या मुलामुलींनी भूषविलेले.

५) प्रत्येक वर्षी २०–२५ विद्यार्थी लॉजिक व इकॉनॉमिक्समध्ये फर्स्ट क्लास मार्क्स मिळवितात. १९७५ साली आमची विद्यार्थिनी कुमारी गोरांडे पारेख मुंबई विश्वविद्यालयाच्या इंटर आर्टस् परिक्षेत पहिली आली व तिने रु. १२०० ची लोटस् स्कॉलरशिप व रु. १२०० ची गंगाबाई भट ह्या दोन स्कॉलरशिप्स मिळविल्या.

**ऑक्टोबर/मार्च बॅचेस—सकाळ, दुपार, संध्याकाळ**
**गुरुवार ता. २० जुलै १९७८ पासून क्लासेस सुरू**

**ॲडमिशन्स जोरात सुरू आहेत. त्वरा करा. मर्यादित जागा.**

मुद्रक : पांडुरंग मोरे, बाम्बे नॅशनल प्रिंटर्स प्रा. लि. ४२, जी. डी. आंबेकर रोड, वडाळा, मुंबई–३१. संपादक व प्रकाशक : श्री. क. ही. काकरे, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, फ्लॅट नं. ८०४ बी, दादर, मुंबई–१४.